साई लीला

खास साई उदी विशेषांक

"आओ साईबाबा"

मार्च] किं. ६० पैसे [१९७९

ब्रह्मानन्दम् परमसुखदं केवलं ज्ञानमूर्तिम् ।
द्वंद्वातीतं गगनसदृशं तत्वमस्त्यादिलक्ष्यम् ।
एकं नित्यं विमलमचलं सर्वधीसाक्षिभूतम् ।
साईनाथं त्रिगुणरहितं सद्गुरुं त्वां नमामि ॥

श्रीसाईनाथ चरणौ मनसा स्मरामि ।
श्रीसाईनाथ चरणौ वचसा गृणामि ।
श्रीसाईनाथ चरणौ शिरसा नमामि ।
श्रीसाईनाथ चरणौ शरणं प्रपद्ये ॥

श्रीसाई वाक्सुधा

जेथें साईंचरित्र पठण ।
तेथें सदैव साई निवसन ।
श्रद्धापूर्वक चरित्रा वर्तन ।
करिता तो प्रसन्न सर्वभावें ॥२२०॥

स्मरतां साईं स्वानंदघन ।
जपतां सन्नाम अनुदिन ।
नलगे इतर जपतप-साधन ।
धारणा ध्यान खटपट ॥२२१॥

साईंचरणीं ठेवूनि प्रीती ।
जे जे या साईंची विभूती ।
नित्यनेमें सेविती लाविती ।
ते ते पावती मनेप्सित ॥२२२॥

धर्मादि चारी पुरुषार्थ ।
पावोनि होती ते कृतार्थ ।
प्रकट होतील सकल गुह्यार्थ ।
स्वार्थ परमार्थ समवेत ॥२२३॥

महापापादि पापें प्रबळ ।
तैसींच उपपातकेंही सकळ ।
उदी संपर्के होती निर्मूळ ।
लाधे निर्मळता सबाह्य ॥२२४॥

–श्रीसाईसच्चरित् अध्याय ३५ वा

श्रीसाईलीला

[श्रीसाईबाबांचे संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक]

वर्ष ५७ वे] मार्च १९७९ [अं. १२

: संपादक :
श्री. क. ही. काकरे,
रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :
- डॉ. श्री. दि. परचुरे, (इंग्रजी आवृत्ती)
- श्री. सदानंद चेंदवणकर (मराठी ,,)

वार्षिक वर्गणी रु. ६–०० (टपाल खर्च सह)
किरकोळ अंक ६० पैसे फक्त.

: कार्यालय :
"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४–बी,
डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई १४.
पिन : ४०००१४
दूरध्वनी : ४४ ३१ ६१

अनुक्रमणिका – मार्च १९७९

१) संपादकीय — श्रीबाबांची उदी
२) आमचे नवे ऑफिस सुपरिंटेंडेंट — श्री. सदानंद चेंदवणकर
३) काळ आला होता पण — डॉ. सुमती खानविलकर
४) अपकिर्तीपासून वाचविले — सौ. उषा अधिकारी
५) श्री बाबांच्या उदीचा प्रभाव — श्री. सूर्यकांत गर्जे
६) उदी हेच रामबाण औषध — श्री. बाळकृष्ण मांजरेकर
७) उदी आणि गाठ — सौ. मुक्ता राणे
८) भक्तांसाठी धाव घेतो — श्री. जनार्दन हुपरे
९) उदी आणि बहिणीची प्रसूती — सौ. एस. ए. लवंदे
१०) साई विभूतीचा चमत्कार — श्री. सूर्यकांत दळवी
११) साईने दिलेले उदीभस्म — कु. साई कल्पना बर्वे
१२) उदी व विंचू दंश — श्री. रामजी पारटकर
१३) उदी आणि साईनामाचा गजर — सौ. उज्वला साठे
१४) साईनाथ व उदी — श्री. विजयकुमार हेजीब
१५) साईं उदीचा चमत्कार — श्री. दत्तात्रय मोखरीवाले
१६) उदी आणि संदीपचा ताप — श्री. एकनाथ मेस्त्री
१७) संजीवनी उदीचा चमत्कार — श्री. संजय फरतोडे
१८) कृतांताच्या दाढेतून — श्री. लक्ष्मण वै.
१९) लेखक कवी पंचम स्नेहसंमेलन — सदानंद चेंदवणकर
२०) डॉ. गजानराव दाभोलकर यांचे अध्यक्षीय भाषण —
२१) शिरडीवृत्त —
२२) उदीचा महिमा — सौ. कलावती चव्हाण
२३) दासनवमी निमित्य रामदास भजन — लीलावती गुजराथी
२४) साईं थोर तुझे उपकार — श्री. संभाजी भांगरे
२५) शिर्डीचे साईबाबा — श्री. विजयकुमार चव्हाण
२६) श्रीबाबांचा आशिर्वाद — पद्मावती दिघे
२७) साईलीलेचे पंचम स्नेहसंमेलन — श्री. विजय हजारे

संपादकीय –

स. न. वि. वि.

श्री बाबांची उदी

धार्मिक व सत्वशील जनमानसात जी काही श्रद्धास्थाने आहेत त्यामधे श्रीसाईबाबांच्या उदीला फार महत्त्वाचे स्थान आहे. व्याधिग्रस्त, निपुत्रिक व दुर्दैवी अशा अनेक व्यक्तींना या उदीचा अनुभव आला आहे हे नाकारता येणार नाही. या उदीचा काही जणांना गुण न आल्याचे कारण म्हणजे श्रद्धेचा अभाव हेच होय. खडकाळ जमिनीवर पेरलेले बी उगवणे शक्य नाही, त्याप्रमाणे अश्रद्ध व नास्तिक लोकांना दिलेली उदी परिणाकारक ठरत नाही. मात्र एखाद्या जीवन्मुक्ताने अन्य माणसाबाबत केलेला संकल्प सत्य होतो. वरील सिद्धांताप्रमाणे श्रद्धा असो अगर नसो, उदीचा शुभ अनुभव अनेकांना येणे शक्य आहे.

श्री साईबाबांच्या हयातीत त्यांच्या हातून मिळालेली उदी जास्त प्रभावीत असे ही गोष्ट अक्षरशः सत्य आहे. अगोदर साईबाबा म्हणजे जीवनमुक्त सत्पुरुष, त्यांच्या सर्व क्रिया अंतर्मनाने चालणार, अंतर्मनाने केलेले संकल्प सत्य ठरतात असा सिध्दांत आहे. कारण जीवनमुक्ताला स्वतःचे मन नसून ते ईश्वरी मनाशी तादात्म्य पावलेले असते. म्हणून जीवनमुक्त पुरुष जे जे संकल्प करील ते ते सर्व ईश्वराचेच संकल्प असल्यामुळे सिद्ध होतात.

जीवनमुक्ताच्या हयातीत त्यांनी दिलेली उदी, अंगारा इ. वस्तू प्रभावी संकल्प प्रोक्षित होऊन आपल्या कामना सिद्ध होतात हे खरे, पण त्याच्या देहपातानंतरही अशा वस्तूपासून गुण येतो आहे याला एक विशेष महत्त्व आहे. जीवनमुक्त पुरुष जिंवतपणी जी कृपा करतात त्यापेक्षा अनंत पटीने कृपा देहत्यागानंतर जास्त होते. जरी ते जीवनमुक्त असले तरी त्यांना जड देहाच्या चौकटीतूनच सारे संकल्प करावे लागतात. असे संकल्प इतरांच्या संकल्पाहून बलवान असले तरी त्याला मानवी देहाचे बंधन हे असतेच. देहपातानंतर त्यांचा लिंगदेह चतुर्मिती होऊन तो खऱ्याखुऱ्या अर्थाने ईश्वर होतो. अतिवाहिक व ज्ञानस्वरूप देहाने तो भक्तांच्या मनःकामना किती पूर्ण करील त्याला सीमा नाही. तुमच्यावर मी जी कृपा केली आहे, त्यापेक्षा अनंतपटीने जास्त कृपा मी देहपातानंतर तुमचेवर करीन असे खुद्द बाबांचे सांगणे आहे. माझी हाडे सुद्धा या तुर्बतीतून बोलतील असे ते म्हणत.

अक्कलकोट स्वामी, शेगावचे श्रीगजानन महाराज, शिरडीचे श्रीसाईबाबा या संतांची कीर्ती त्यांच्या समाधीनंतर जगभर पसरली. त्यांच्या हयातीत ते इतरेजनांना सामान्यच दिसले. साईबाबांच्या समाधीनंतरच शिरडीला टोलेजंग इमारती होऊन भारतातून भक्तजनांचा पूर तिथे लोटू लागला. शिरडीस साठ वर्षांपूर्वी बाबांनी आपल्या हाताने चिमटा मारून पेटविलेल्या धूनीतून आज उदी प्राप्त होते आहे. बाबांचे भक्त मुक्तहस्ते ही उदी नेण्यासाठी येतात, व नेतात. या उदीचा आश्चर्यकारक दिव्य अनुभव त्यांना येतो. भक्तांच्या अशा चमत्कारीक अनुभवांनी लिहिलेल्या मजकूराचा हा अंक साईभक्त प्रेमींना विशेष आवडावा म्हणून यत्न केले आहेत. बाबांच्या साठाव्या पुण्यतिथीनिमित्त पूर्वीच जाहिर केलेल्या मालिकेतील हा पाचवा अंक आहे. आमच्या वाचकांना तो आवडेल अशी आशा वाळगतो.

★

☆ दि. २० ते २७ मार्च नागपूर – विदर्भ दौरा ☆

"श्री साईबाबा संस्थान शिरडी" च्या सौजन्याने

श्री साईबाबांचे
तेजस्वी जीवन रंगभूमीवर

कुमारसेन गुप्ते
साईभक्तांसह सादर करीत आहेत
"आरती थिएटर्स" (मुंबई) निर्मित

शिर्डीचे श्री साईबाबा

लेखक/दिग्दर्शक : किरण दुधाळकर • नेपथ्य : दत्ता चौडणकर
• निर्माता/संगीत : कुमारसेन गुप्ते

सार्वजनिक संस्थाना खास सवलत
शतक महोत्सवाकडे
यशस्वी वाटचाल

संपर्क : कुमारसेन गुप्ते,
१४ पितांबर लेन, माहीम, मुं. १६.
फोन : ४५ ६५ ४१

आमचे नवे ऑफिस सुपरिंटेंडेंट

श्री. द. चिं. पाठक साहेब

● सदानंद चेंदवणकर
कार्यकारी संपादक, श्रीसाईलीला

● श्रीसाईबाबा संस्थान शिरडीचे जुने ऑफिस सुपरिंटेंडेंट श्री. शंकरराव गोडखिंडी यांनी गेल्या मे महिना अखेर राजीनामा दिला व त्या जागेवर गेले सहा महिने कुणाचीही नेमणूक करण्यात आली नव्हती, पण गेल्या डिसेंबरमध्ये या जागेवर एका कुशल व कर्तबगार अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. त्यांचे नाव आहे श्री. दत्तात्रय चिंतामण पाठक. पाठक या आडनावात काय जादू आहे कुणास-ठाऊक ? जुने रिसिव्हर साहेब पाठक यांचे प्रमाणेच हे नवे ऑफिस सुपरिंटेंडेंट पाठकसाहेब माणूसलोभी सद्गृहस्थ आहेत.

ते मूळ सोलापूर जिल्ह्यातल्या सांगोल्याचे. त्यांचा जन्म १९१६ साली तिथे झाला. त्यांचे शिक्षण सांगोला, पंढरपूर व पुणे येथे झालेले आहे. पंढरपूरच्या व्ही. जे. हायस्कूल (सध्याचे लो. टिळक विद्यालय) मधून ते मुंबई विद्यापीठाची मॅट्रीकची परीक्षा १९३४ साली उत्तम प्रकारे उत्तीर्ण झाले. आपल्या हायस्कूलमधून ते पहिले तर आलेच पण सबंध सोलापूर केंद्रात त्यांचा पहिला क्रमांक आला. पुढे उच्च शिक्षणासाठी त्यांनी पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजात प्रवेश केला त्यावेळी ते महाविद्यालय रँगलर जी. एस. महाजनी यांच्या प्राचार्य पदाखाली होते. त्या शिक्षणसंस्थेतून पाठकसाहेब गणित व भौतिकशास्त्र हे विषय घेऊन १९३८ साली बी. एससी. झाले. लगेच त्यांनी सावदा येथल्या शाळेत शिक्षक म्हणून नोकरी पत्करली, पण त्या नोकरीत त्यांचे मन रमेना म्हणूनच की काय तीन चार महिन्यातच त्या नोकरीला त्यांनी राम राम ठोकला. पुढे त्यांनी रेव्हिन्यू खात्यात एक साधे कारकून म्हणून नोकरी पत्करली व वाढत वाढत केवळ आपल्या अक्कल हुषारीवर ते १९५९ साली नेवासे येथे मामलेदार झाले. दोन वर्षे ते तिथे व पुढे १९५९ ते १९६१ हा दोन वर्षांचा काळ संगमनेर येथे मामलेदार होते. त्यानंतर अहमदनगर येथे जिल्हा पातळीवर व विभागीय पातळीवर उघडल्या गेलेल्या सरकारी प्रशिक्षण केंद्रावर सुपरिंटेंडेंट म्हणून त्यांनी कामकाज पाहिले. १९६४ साली पुणे येथे डेप्युटी कलेक्टर म्हणून त्यांना बडती मिळाली. पुणे येथे पानशेत पूरग्रस्त पुर्नवसन कामावर त्यांचीच

देखरेख अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली होती. पुढे सांगली जिल्हा पुरवठा अधिकारी म्हणून १९६५ ते १९६८ अखेर त्यांनी काम पाहिले; व १९६८ ते १९७१ लँड सेलींग डेप्युटी कलेक्टर या अधिकारपदावर ते होते.

सध्या श्रीसाईबाबा संस्थान शिरडी या विश्वव्यापी संस्थेच्या मुख्य कार्यालयात ऑफिस सुपरिंटेंडेंटपदाची जबाबदारी त्यांच्यावर शासनाने सोपविलेली आहे व ही जबाबदारी ते आपल्या पूर्वीच्याच पदाप्रमाणे यशस्वीरित्या हाताळतील व पार पाडतील अशी खात्री वाटते.

स्वभावाने श्री. पाठकसाहेब आतिथ्यशील व सुस्वभावी आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यायालयधारक श्री. काकरेसाहेब यांच्या अधिपत्याखाली श्रीसाईबाबा संस्थानची आणखीन भरभराट व्हावी हीच श्रीसाईचरणी प्रार्थना.

शिरडीचे साईबाबा

- बाबांच्या प्रेरणेने मी श्रीसद्गुरु साईबाबांची मूर्ती तयार केली आहे.
- बाबांना पहाताना आपण समाधी-मंदिरात आहोत असा भास होतो.
- बाबा सिंहासनावर विराजमान झाले आहेत.
- बाबांच्या सिंहासनाची उंची १६ इंच व बाबा १२ इंच आहेत.
- आपल्या घरी पुजेसाठी तयार केली आहे.
- बबांना आपण स्वतः घेऊन जाणे. आम्ही रेल्वेने पाठविणार नाही.
- ज्यांना पाहिजे असेल त्यांनी आमचेकडे पत्र पाठविणे. आम्ही माहिती देवू.
- बाबांना भरजरीचा पोषाख करता येतो. अशी व्यवस्था केली आहे. जरीची शाल व बाबांच्या डोक्याला बांधण्याचे रेशमी कापड.

मिळण्याचा पत्ता :— गुरुप्रसाद, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

कलाकार : **डी. के. आधवमास्तर.** टे. फो. नं. ५३८४४२

उदीचा प्रताप

काळ आला होता पण वेळ येऊ दिलीच नाही

—सौ. सुमती खानविलकर, लोनावळा

● आमची जेवणं उरकली व सर्व जण गप्पा करत बसलो होतो. इतक्यात माझा नातू धावत धावत माझ्याकडे आला व मला बिलगला, पहाते तर त्याचे अंग गरम लागले. दिवसभर चांगला खेळत होता.

थर्मामिटर घेतले व लावले तर साडेचार पर्यंत ताप. काय प्रकार समजेना. त्याचे तोंड सुकलेले. संध्याकाळी चांगला खेळत होता, जेवला होता, एकाएकी असे का व्हावे समजेना. दुसऱ्या डॉक्टरना बोलवावे तर मुलाची रात्रपाळी, गडी काम उरकून घरी गेलेला, मुलगी सुप्रभा व सून दोघी माझ्याजवळ होत्या पण दोघी गांगरून गेल्या. योगायोग म्हणजे फोन पण बिघडला. काही सुचेना. असे करता करता अकरा वाजले. थर्मामिटर लावले आणि माझेच डोळे पांढरे होण्याची वेळ आली. थर्मामिटर सहापर्यंत ताप दाखवित होते. काय करावे, मुलगा तर अगदी निचेत पडला. डोक्यावर कोलन वॉटरची घडी ठेवली तर तो रडू लागला. काहीच सुचेना, जवळच्या खोलीत दवाखाना असतानासुद्धा आता शेवटचा उपाय म्हणून मी मुलाला सांगितले, जारे आपल्या बाबांची उदी घेऊन ये. त्याने आणली, ती याच्या तोंडात घातली व डोक्यापासून पायापर्यंत व पायापासून डोक्यापर्यंत बाबांचे नाव घेत लावू लागलो, काही फरक होईना. इतक्यात मोलकरीण म्हणाली, आज आमावस्या, बारा वाजलेत. काय, हाय काय समजना. झाले. कुठे थोडाफार त्राण होता तो पण आमचा जाऊ लागला. पण ऊदीचा प्रयोग चालूच होता, कळवळून बाबांना हाक मारणे चालू होते. सारखे घड्याळाकडे लक्ष्य, काटा बाराकडे झुकू लागलेला. आता काय आपण पहाणार, मन भांबावून गेले. बारा वाजले. छातीत धडधडू लागले. आस्ते आस्ते काटा बाराचा आकडा सोडून पुढे सरकला. मनात घाणेरड्या विचारांनी गोंधळ माजवून ठेवला. सारे भयाण वाटू लागले. इतक्यात बारा वाजून दहा मिनिटे झाली व त्याच्या डोळ्यांची थोडी हालचाल झाली. इंदू मला दाखवू लागली, दोघांच्या डोळ्यातून पाण्याच्या धारा चालूच होत्या. इतक्यात त्याने बाबा म्हटले, एक बाजूने आनंद झाला पण लगेच असे वाटले जाताना दिवा मोठा होतो तसे तर नसेल, पण नाही. थोड्याच वेळात भ्रम

निरसन झाला व पूर्वस्थितीत तो हळू हळू येऊ लागला. साडेबाराला तो व्यवस्थित बोलला, बाथरुमला जाऊन आला. या संपूर्ण वेळात त्याला कोणतेच औषध दिले नव्हते. साधा कांदासुद्धा नाकाला लावला नव्हता. पण त्या काळाच्या दाढेतून निव्वळ बाबांनीच आपली उदी लावून त्याला बाहेर काढले होते. औषधाने गुण आला त्यामुळे बचावला असे म्हणण्यास जागाच नाही. या सच्चिदानंदाला रात्रंदिवस विश्रांती नाही. श्रीसद्गुरु बाबा साई तुजवाचूनी आश्रय नाही. हे शब्द सहज मुखातून बाहेर पडतात.

अपकीर्तीपासून वाचविले

— सौ. उषा प्रभाकर अधिकारी,
बंदररोड, रत्नागिरी

● गेल्या ६ महिन्यापूर्वीची गोष्ट. आमचे प्राथमिक शिक्षकांचे गटसंमेलन शिरगाव शाळेत करावयाचे ठरले होते. अशी संमेलने दर तिमाहीस वेगवेगळ्या शाळातून होत असत आणि त्यात नवीन डी. एड्. झालेल्या शिक्षकाने आदर्श पाठ घेऊन दाखवायचा असे. सदर संमेलनात इ. १ लीवर आमच्या भाटीमिऱ्या शाळेतील डी. एड्. झालेल्या एका शिक्षिकेचा गणित विषयाचा पाठ लागला. पण आयत्या वेळी तिला ऑफिस कामाला बोलावणे आले. आता पाठ कुणी घ्यायचा ? मला पाठासंबंधी विचारण्यात आले. मी म्हटले, "मी डी. एड् नाही. मॅट्रिक ट्रेंड आहे. मी पाठ घेईन पण बाबांनी आज्ञा दिली तर" ! दुसऱ्या दिवशी आंघोळ वगैरे करून मी बाबांपुढे चिठ्या टाकल्या. परवानगी मिळाली. संमेलनाचा प्रत्यक्ष दिवस उजाडला आणि माझ्या पित्तविकाराने जोर केला. डोकं दुखू लागलं. उलट्या होऊ लागल्या. हातपाय गळून गेल्यासारखे वाटले. तरीपण सकाळी ७ च्या बसने मी भाटीमिऱ्या शाळेत गेले. पाठाचे सर्व साहित्य गोळा केले. ९ ला शाळा सुटल्यावर घरी आले. उलट्या थांबल्या नव्हत्याच, आणि डोकंही चढलेलं होतंच. घरी आल्यावर जेऊन ११ च्या बसने शिरगावला जायचे होते. मी जेवले पण उलटी झालीच. मला

ब्रह्मांड आठवले. आता या अवस्थेत मी शिरगावला जाऊ कशी ? पाठ घेऊ कशी ? आयत्या वेळी नाही म्हणून कळविले तर गैरसमज होणार आणि २ तपांच्या तपश्चर्येवर पाणी पडणार. मी पुन्हा श्रीबाबांना चिठ्या टाकल्या. पुन्हा पाठ घेण्याचीच आज्ञा. मग मी बाबांच्या फोटोपुढे उभी राहिले. उदी कपाळाला लावली. रुमालाच्या टोकात उदीची पुडी बांधून कमरेला खोचली आणि केविलवाण्या स्वरात बाबांना म्हटले, "बाबा, मी आपली आज्ञा पाळून शिरगावला जात आहे. पण आजचा पाठ तुम्हीच घ्यावयाचा आहे. मला शक्ती द्या, कृपाहस्त मजवर ठेवा आणि या प्रसंगातून निभावून न्या. मी गेली २४ वर्षे नोकरी केली आहे ती उराशी ध्येय बाळगून आणि माझ्या व्यवसायाशी प्रामाणिक राहून. त्या माझ्या तपश्चर्येला तडा जाऊ देवू नको" प्रार्थना केली आणि बस स्टॉपवर गेले. आमच्या घरापासून तो बराच दूर आहे, पण बाबांचे नाव घेत मी गेले आणि बसने शिरगाव गाठले. माझा उतरलेला चेहरा, अमृतांजनाचा वास माझे आजारपण बोलत होता, पण मी गप्प होते. योग्य वेळी संमेलनाला सुखात झाली. मी बाबांचे स्मरण केले, मनोमन वंदन केले आणि शिकवायला सुरूवात केली. बरोबर तिसाव्या मिनिटाला मी खडू खाली ठेवला. पाठ संपला होता. "पाठ अतिशय सुंदर झाला, उणीव काढण्यासारखे त्यात काही नव्हतेच, उलट इतके सुंदर शिकविणे आपण काही अजून पाहिले नाही" असे अनेक शिक्षक शिक्षिका बोलत होते. माझ्या सहभगिनी माझी पाठ थोपटीत होत्या. मला अपरिचित पण त्या ३० मिनिटात परिचित झालेली छोटी बालके माझ्या पायाला बिलगून, बाई, परत कधी याल शिकवायला ? आम्हांला फार आवडलात तुम्ही, असे लाडीक स्वरात म्हणत होती. मी सगळे ऐकत होते पण माझे डोळे डबडबून आले होते. आता माझी डोकेदुखी थांबली होती. उलट्या बंद झाल्या होत्या. बाबा माझ्यासाठी धावले होते. मला निमित्तमात्र मुलांपुढे उभी करून त्यांनीच तो पाठ घेतला होता आणि आपल्या वेड्या मुलीला अपकीर्तीपासून वाचवले होते. मी पुन्हापुन्हा मनोमन त्यांना वंदन केले. माझ्या पर्समधील त्यांचा फोटो काढून त्यांच्या पदयुगुलांचे चुंबन घेतले आणि माझ्या अश्रूंना वाट मोकळी करून दिली.

साईधामतर्फे बालस्पर्धा

साईधामचे विश्वस्त श्री. भाई मालपेकर, नवशक्तिकार श्री. पु. रा. बेहेरे यांचे आभारप्रदर्शन करताना—

आंतरराष्ट्रीय बालवर्षानिमित्त्य गिरगावातील साईधाम मंदिरातर्फे सशक्त व निरोगी बालकांची एक शरीरसौष्ठव स्पर्धा व महिलांसाठी हळदीकुंकू हे कार्यक्रम गेल्या मकरसंक्रांत ता. १४-१-७९ रोजी सायंकाळी ४ ते ७ या वेळात आयोजित करण्यात आले होते. मुलांच्या शरीरसौष्ठव स्पर्धेत सुमारे १०० मुलांनी भाग घेतला होता. या प्रसंगी 'नवशक्ति' दैनिकाचे संपादक श्री. पु. रा. बेहेरे अध्यक्ष म्हणून हजर होते. वाडिया हॉस्पीटलचे बालरोग तज्ज्ञ डॉ. कृष्णकुमार एन्. शहा यांचे शुभहस्ते यशस्वी बालकांना बक्षिसे वाटण्यात आली. गट क्रमांक १ (वय १ ते ३ वर्षे) मानकरी बालके—१) कु. बेबी शिरोन मिश्रा १ ले बक्षिस १०१ रु. २) दुसरे बक्षिस रु. ७५ कुमार राजिव रामदास प्रभु, ३) तिसरे बक्षिस रु. ५१ मंदार पंडित. गट क्रमांक २ (वय ३ ते ६ वर्षे) १ ले बक्षिस १०१ रु. हेमांग सतिश नाडकर्णी, दुसरे बक्षिस रु. ७५ अनिल कांबळी, तिसरे बक्षिस रु. ५१ निखिल जयप्रकाश सामंत.

साईधामचे कार्यकारी विश्वस्त श्री. भाईसाहेब मालपेकर जे. पी., यांनी सर्वांचे स्वागत करून संस्थेची माहिती सांगितली. संस्थेतर्फे महाशिवरात्रीस श्रीसाईसच्चरित्रातील ११ व्या अध्यायाचा सामुदायिक पठणाचा सुंदर कार्यक्रमही आयोजित करण्यात आला होता.

श्री बाबांच्या उदीचा प्रभाव

****

— श्री. सूर्यकांत माधवराव गर्जे,
८० शिवाजी नगर, पुणे–५.

● अशाच एका गुरुवारी डॉ. पिल्ले आमच्या श्रीसाईनाथ मंदीरात आले. तसा डॉ. पिल्ले व आमच्या मंदीराचा फार जुना स्नेहसंबंध. पूर्वी न चुकता अगदी दररोज डॉ. पिल्ले मंदीरात आरतीला हजर रहायचे. अनेक वर्षांचा तो एक नित्य-क्रम होऊन राहिला होता. परंतु अलिकडे वयोमानाप्रमाणे व व्यवसायामुळे दररोज येणे त्यांना शक्य होत नाही. म्हणून श्री बाबांच्या भक्तीत खंड पडला असे मात्र मुळीच नाही. उलट मला असे दिसले की, श्री बाबांच्या कृपाछायेखाली डॉ. पिल्ले सुखेनैव नांदत आहेत.

गप्पांच्या ओघात मी म्हणालो– "पिल्लेसाहेब, तुम्ही व्यवसायाने डॉक्टर. रोग्यांना तपासणे हे तुमचे काम. रोगी आजारातून बरा करून त्याला पुर्नजन्म देणे या इतके महान् पुण्य-कर्म या पृथ्वी-तलावर दुसरे आढळणार नाही. तर मग या कार्यात श्री बाबांचे काही अनुभव आपणास आले असतीलच ना !"

"शेकडो !" डॉ. पिल्ले पटकन् उत्तरले व पुढे सांगू लागले–

"पंधरा वर्षे झाली असतील त्या घटनेला. सकाळची वेळ होती. मी नुकताच दवाखाना उघडून खुर्चीवर बसलो होतो. एवढ्यात् दारापुढे इम्पाला कार येऊन थांबली. आसामी मोठी असावी. मी मनाशी अंदाज बांधला. गाडीतून एक मध्यम वयाची, गौर वर्णीय, उंच सडपातळ, गुजराती पद्धतीची साडी नेसलेली स्त्री उतरली. पाठोपाठ आधुनिक पेहेराव केलेला, डोळ्यावर काळा गॉगल असलेला गृहस्थ उतरला. (दोघे पती-पत्नी होते. हा खुलासा नंतर झाला.) दवाखान्याची पायरी चढून दोघे आत येऊन माझ्या पुढ्यात येऊन उभे राहिले. तो गृहस्थ सस्मित वदनाने नमस्कार करीत म्हणाला– "ह्या माझ्या पत्नी लीलाबाई, गेले १५ दिवस झाले. यांच्या पोटात एकाएकी कळ येऊन जीव घाबरा होतो. सर्वांगाला दरदरून घाम फुटतो. अलीकडे तर जेवणावरही वासना जात नाही. किरकोळ घरगुती उपचार केले. परंतु काही एक गुण नाही. काल माझ्या एका मित्राने आपले नाव सुचविले म्हणून सकाळीच आपलेकडे धाव घेतली."

"ठीक आहे!" मी म्हणालो व लीलाबाईंची कसून डॉक्टरी तपासणी केली. काही पथ्य सांभाळायला सांगितले. गोळ्या व इंजेक्शन बाहेरून आणण्यासाठी कागदावर लिहून दिले. जवळ जवळ तीन आठवडे अत्यंत पद्धतशीर औषधोपचार केले. गोळ्या व इंजेक्शन्सही बदलून पाहिले. परंतु म्हणावा तितका गुण आला नाही. व्याधीची तीव्रता थोडी कमी झाली एवढेच परंतु मूळ आजार होता तसाच राहिला.

एके दिवशी मी लीलाबाईंना— "बाई, मी सर्व उपचार केले. परंतु गुण येत नाही. बरे आजाराचे निश्चित निदान सुद्धा मला झाले नाही. तेव्हा एखाद्या स्पेशालिस्ट डॉक्टरकडे आपण जावे हे उत्तम. माझा एक मित्र डॉ. ××× अशा केसमध्ये निष्णात आहे. त्यांना मी चिठ्ठी देतो, तरी उद्या आपण त्यांना जाऊन भेटावे." असा सल्ला देऊन त्या बाईंची मी बोळवण केली. या गोष्टीला १०/१२ दिवस झाले असतील नसतील तोच एके दिवशी सायंकाळी इम्पाला कार आमच्या दवाखान्यासमोर येऊन थांबली. गाडीतून दोघे पती-पत्नी उतरले. सावकाश पायऱ्या चढून माझ्या टेबलाजवळ आले. लीलाबाईंना बराचसा थकवा आल्यासारखा दिसत होता. बाई म्हणाल्या— "डॉक्टरसाहेब, तुमचं औषध घेत होते त्यावेळी थोडा का होईना आजाराला उतार पडला होता. परंतु आजाराने आता खूपच उचल खाल्ली आहे. जीव अगदी नकोसा झालाय. डॉक्टर, काही करा. मला तुमचेच औषध द्या. नाही तर मी फार दिवस जगत नाही, डॉक्टर." लीलाबाईंना एव्हढं बोलताना धाप लागली होती. मी त्यांची समजूत काढीत म्हणालो, "बाई, असा धीर सोडू नका. तुम्हाला बरं वाटेल. मी देतो तुम्हाला औषध." असं म्हणून मी आतल्या खोलीत गेलो. एका बाटलीत तयार केलेले औषध घेतले. थोडे त्यांत पाणी टाकले व श्री बाबांच्या फोटोला मनापासून नमस्कार केला. दोन मिनिटे डोळे बंद करून श्री बाबांचे चिंतन केले व शिर्डीहून आणलेली श्री बाबांची थोडी उदी बाटलीत टाकून बाटली हलवली व बाहेर येऊन बाटली बाईंच्या स्वाधीन करून म्हटले "सकाळ, दुपार, संध्याकाळ दिवसातून तीन वेळा डोस घ्या. उद्या परत या. बरं वाटेल."

दररोज लीलाबाई येत व श्री बाबांची उदी टाकून मी त्यांना औषध देई. हा क्रम जवळ जवळ १५/२० दिवस चालला. पुढे पुढे तर बाईंचा नोकर येऊन औषध घेऊन जाऊ लागला, आणि एके दिवशी सायंकाळी स्वतः लीलाबाई दवाखान्यात दत्त म्हणून हजर झाल्या. मी तर आश्चर्य चकीत झालो. बाईंचा चेहरा प्रफुल्लित दिसत होता. खेळकर हंसरे डोळे माझ्याकडे कृतज्ञतेने पहात होते.

मी बोलायचे म्हणून म्हणालो– "बाई, कशी काय तब्बेत आता ?" बाई खळाळून हसल्या आणि म्हणाल्या– "डॉक्टर, तब्बेत एकदम सुधारली. पूर्वीपेक्षाहि ! भूक पण सपाटून लागते. परवा तर मी मुलांच्या बरोबर शिवणापाणी–लपंडाव खेळले !" आणि पुनः एकदा बाई खळखळून हसल्या. नंतर बाई थोड्या गंभीर होत म्हणाल्या– "डॉक्टर, कुठलं हो औषध तुम्ही मला दिले ? सुरुवातीलाच का बरे ते औषध दिले नाही ?"

माझ्या डोळ्यांत आंसवे जमा झाली होती. मी खुर्चीवरून उठलो व बाईना आतल्या खोलीत घेऊन गेलो. श्री बाबांच्या फोटोकडे हात दाखवीत मी म्हणालो– "बाई, हे तुमचे डॉक्टर ! यांनी तुम्हाला बरे केले ! !" बाईंना सर्व समजावून सांगत असताना दोन कढत अश्रू माझ्या गालावरून ओघळून जमिनीवर पडले.

☆

साईभक्त डॉ. दिलीप जायस्वाल यांचे निधन



श्रीसाईलीलेचे सन्माननीय लेखक डॉ. अनिल जायस्वाल, नागपूर यांचे धाकटे बंधू डॉ. दिलीप यांचे दि. १५ जानेवारी ७९ रोजी दुपारी ४ वा. नागपूरच्या मेडिकल हॉस्पीटलमध्ये अवघ्या तीन दिवसांच्या आजाराने दुःखद निधन झाले. त्यांना ॲक्युट लिम्फॅटिक्स ल्युकेमिया–रक्त कर्करोग–झाला होता. निधनसमई त्यांचे वय अवघे २३ वर्षांचे होते. ते श्रीसाईबाबा व श्री सती अनुसयामाता यांचे परमभक्त होते. ते निष्णात डॉक्टर होते व आपल्या वडील बंधूना डॉ. अनिलना–लेखनकार्यात सर्व प्रकारची मदत करीत असत. त्यांच्या पश्चात वयोवृद्ध मातोश्री, बंधू इ. परिवार आहे. आम्ही डॉ. श्री. अनिल यांच्या दुःखात सहभागी आहोत.

श्रीसाई मृतात्म्यास चिरसद्गती व परमशांती देवो.

॥ साई हेच अमुचे फॅमिली डॉक्टर उदी हेच रामबाण औषध ॥

—श्री. बाळकृष्ण वासुदेव मांजरेकर,
टोपीवाला बिल्डींग, रूम नं. ३८
डॉ. आंबेडकर रोड, परेल, मुं. नं. १२.

● माझी मुलगी कु. शुभांगी ही सव्वा वर्षाची असताना एके दिवशी तिची प्रकृती बिघडली, म्हणजे तिला त्या दिवशी शौचास झाले नाही. घरात कोणीही वयस्कर गृहस्थ नसल्याने तसेच ही पहिलीच मुलगी असल्याने आम्हा पतीपत्नीस काय करावे हेच सुचेना. मुलीला घेऊन आम्ही फॅमिली डॉक्टरकडे गेलो. त्याने पोट तपासले व औषध देऊन सांगितले, आज रात्रीपर्यंत तिला शौचास होईल, घाबरण्याचे काही कारण नाही. आम्ही त्याच्या बोलावर विश्वास ठेऊन घरी आलो, औषध दिले परंतु त्याचा काहीही उपयोग झाला नाही. दुसऱ्या दिवसापर्यंतचे औषध असल्याने दुसऱ्या दिवशी रात्रीपर्यंत आम्हाला वाट पहाणे क्रमप्राप्त होते. परंतु दुसऱ्या दिवशीची रात्र उलटली तरी मुलीच्या शौचाचे काहीच समजेना. तिसरा दिवस उजाडला तो रविवारच. मुलीचे पोट चढले होते. हाताला कडक लागत होते. आमच्या तोंडचे पाणीच पळाले. काय करावे सुचत नव्हते. दोन दिवसपर्यंत शौचास होत नव्हते तरी मुलगी दूध मात्र पीतच होती. आम्हालाही काहीच अनुभव नसल्याने आम्ही दूध देत राहिलो. रविवारच्या दिवशी काय करावे ह्या काळजीत असतानाच माझी नजर बाबांचे फोटोकडे गेली.

मनातल्या मनात बाबांना आळविले, काहीतरी उपाय सुचवा अशी प्रार्थनाही केली. आणि क्षणभरच ! मुलीला पत्नीकडे देऊन मी उठलो. बाथरुममध्ये जाऊन अंघोळ केली. बाबांचे समोर उभा राहून मनोभावनेने साईस्तवनमंजिरी वाचून काढली. मी हे सर्व अचानकपणे इतक्या लवकर आटोपले की पत्नीही मजकडे पहातच राहिली. स्तवनमंजिरी वाचून झाल्यावर फोटोसमोरील स्टीलचे डब्यातील बाबांची उदी एका पेल्यात घेऊन त्यात पाणी घालून पत्नीकडे दिले, व मुलीला एक एक चमचा पाजण्यास सांगितले.

पत्नीनेही बाबांचे तसबीरीकडे एकबार पाहून उदीयुक्त पाणी पाजण्यास सुरूवात केली. फक्त पाच मिनिटे गेली असतील-नसतील मुलीला एकामागून एक

असे तीन वेळ पातळ परसाकडला झाले. आम्ही चकीत झालो. तिचे पोटही हलके झाले. काही वेळातच ती खेळूही लागली. यावेळी आम्ही साईंचे किती आभार मानले असतील त्याची केवळ मोजदादच नाही.

हे साईप्रभू आम्हा पामराकडून कितीतरी चुका होतात मात्र तू रागावू नकोस कारण तुझ्याशिवाय आमचे इथे पानही हालत नाही रे !

☆

उदी आणि गाठ

—सौ. मुक्ता राणे,
२/३३ वरळी बी. पी. टी.
क्वार्टर्स, वरली व्हिलेज,
मुंबई, २५

● माझा १५ वर्षाचा मुलगा चि. पुष्कराज याच्या डाव्या दंडावर एक छोटीशी गाठ आलेली होती. त्याला वेदना होत होत्या. गाठ म्हटल्यावर मनात एकप्रकारची भीती वाटू लागली. माझी श्रीसाईबाबांवर श्रद्धा असल्यामुळे मी मनोमन बाबांची प्रार्थना केली की, देवा, माझ्या मुलाची गाठ नाहीशी झाली (पंधरा दिवसात) तर हा अनुभव मी 'श्रीसाईलीला' मासिकासाठी पाठवीन. बाबांचे नामस्मरण व प्रार्थना करून शिरडीची द्वारकामाईतील घरात असलेली उदी त्याच्या कपाळी लावली. पोटात दिली व गाठीवरही चोळली, आणि खरोखरच त्याच्या वेदना कमी झाल्या व गाठही गेली. भक्तीच्या जोडीला श्रध्दा व सबुरी असल्यास ही साईमाऊली आपल्या भक्तांच्या हाकेला धावून येतेच, असे असंख्य अनुभव मला आजपर्यंत आलेले आहेत. त्या साईमाऊलीची कृपादृष्टी अशीच आम्हा भक्तांवर सदोदित असो हीच श्री साईबाबांच्या चरणी प्रार्थना.

☆

—"भक्तासाठी धाव घेतो साईबाबा"—

—श्री. जनार्दन विष्णू हुपरे,
वार्ड नंबर ९/५९० (२),
शाहूनगर, इंडस्ट्रिअल इस्टेट
इचलकरंजी (जि. कोल्हापूर).

'आमच्या घराशेजारील श्री. विराजदार यांचे घरी गेल्या महिन्यापासून कोणताही स्वयंपाक, चहा, दूध गरम करताना आपोआपच ते खारट होत असत.

हे समजल्यावर परवा शिरडीहून प्रसादानिमित्य आलेला अंगारा (उदी) देऊन श्री साईं चरणी प्रार्थना केली की, 'या गरीबावर आलेले संकट तूच दूर कर' आणि आश्चर्य असे की, अंगारा (उदी) दिल्यापासून त्यांच्या घरातील सर्व स्वयंपाक व्यवस्थित होत आहे.'

साईनाथांनी माझी प्रार्थना मान्य करून त्यांना सुखी केले.

साईंबाबांनी भक्तासाठी नकळत का होईना आमच्याकडे येऊन वास्तव्य केले असे म्हटल्यास अतिशयोक्तीचे होणार नाही.

अशा या माझ्या साईंनाथास कोटी कोटी प्रणाम...

★

उदी आणि बहिणीची प्रसूती

—सौ. एस. ए. लवंदे,
कळंगुट, बारदेश गोवा.

● गेल्या वर्षी मी माझ्या बहिणीला तिच्या प्रसूतीकरीता माझ्या घरी आणली होती, व प्रसूती वेदना होताच मी तिला घेऊन हॉस्पीटलमध्ये गेले. एक दिवस गेला. दुसरा दिवस आला तरी ती प्रसूत होईना व कळा एकदम कमी प्रमाणात येऊ लागल्या. डॉक्टरानी पुष्कळ उपचार केले, पण काहीच उपयोगाला येत नव्हते.

माझा तर साईबाबांवर पूर्ण विश्वास असल्याने तोच तिची लवकर सुटका करील म्हणून मी तिला बाबांची उदी पाण्यात घालून देत असे व थोडी कपाळाला लावीत असे. होता होता साडेतीन वाजले. आता थांबून काहीच अर्थ नाही असे सांगून डॉक्टर तिला घेऊन प्रसूती खोलीत गेले. तिथे सुद्धा उपचार चालूच होते. शेवटी कशीच सुटका होईना. आत यंत्रांचा आवाज येत होता व तिचा आवाज नाही, तिची स्थिती मंद झाली होती. शेवटी मी मनात एकसारखा बाबांचा धावा केला, की बाबा आता तरी माझा अंत न पहाता तुझ्या भक्ताच्या हाकेला धावून ये व तिची सुटका कर. मी तुझा अनुभव साईलीला मासिकात प्रसिद्ध करीन. तोंच बाळ रडण्याचा आवाज झाला. नर्स येऊन सांगू लागली की आपोआप सुटका झाली व मुलगा झाला. हे एकताच माझ्या डोळ्यातून आनंदाश्रू बाहेर आले व बाबांची लीला अगाध असल्याची खात्री झाली. तो मुलगा आता सव्वा वर्षाचा असून चांगला आहे.

* * *

उदीने रोग बरा झाला

गेल्या महिन्यात माझा मुलगा साईनाथ एकाएकी आजारी झाला. त्या आजाराचे औषध घेता घेता दुसरे दुखणे आले. माझ्या मनाला एकसारखी भिती वाटू लागली की, दोन्ही आजार भिन्न असल्याने भिन्न भिन्न औषधे कशी द्यावयाची. त्यावेळी मी बाबांच्या तसबीरीला नवस केला की, दुसऱ्या दुखण्यावर तुझ्या उदीचा उपयोग करीन व तुझा अनुभव प्रसिद्ध करीन, माझ्या मुलाला गुण येऊ दे. त्याप्रमाणे रोज त्याला उदी लावायची व पाण्यातून द्यावयाची, असे करता करता रोग बरा झाला.

साईबाबांच्या विभूतीचा चमत्कार

— श्री. सूर्यकांत रघुनाथ दळवी,
१५/१९३० पंतनगर,
घाटकोपर, मुंबई–७५.

● मी गेली २० वर्षे श्री साईबाबांच्या फोटोची पूजा करतो. श्री साईबाबांच्या कृपेने माझे लग्न योजिलेल्या मुलीशी १९६२ साली झाले. योजण्याच दिवसात माझी पत्नी भूतबाधेने आजारी झाली. पुष्कळ औषधोपचार केले काही कमी नाही. काय

करावे हेच सुचेना. त्याच परिस्थितीत पत्नीला माझ्या राहत्या गावी तालुका-कणकवली येथे माझ्या वडिलांकडे औषधोपचारासाठी पाठविले. माझी मनोभावे भक्ती पाहून श्री साईबाबा शाळा मास्तरच्या रूपाने आमच्या घरी आले. त्यांना माझ्या पत्नीचे आजारपण समजून सांगण्यात आले. त्यांनी आपल्या जवळची विभूती फक्त २१ दिवस पाण्यातून पिण्यास द्यावी असे सांगितले. शाळा मास्तरास माझे वडील चहा देत होते. परंतु त्यांनी चहा-पाणी, पैसे मला नको म्हणून ते निघून गेले. २१ दिवस विभूती घेतल्यावर पत्नी नेहमीप्रमाणे आपली सर्व कामे करू लागली. सध्या मला २ मुलगे, २ मुली आहेत. संसार आनंदात चालला आहे. श्री साईबाबांबद्दल सांगावे तेवढे थोडेच. अशी आहे श्री साईबाबांची कृपा.

श्रीसाईंनी दिलेले उदीभस्म

—साईकल्पना गणेश वर्दे
मेंगदे वाडा, खारीवाव रोड, बडोदे

॥ ज्यांचे घरी साई ध्यास । तेथे शांति नांदे खास ॥

खरचं श्रीसाईंचे नाव घेताच असे वाटते की, आपण जर श्रीसाईबाबांना प्रत्यक्षात पाहिले असते; तर किती बरे झाले असते. प्रत्यक्षात श्रीसाईना न पाहताच व नुसते अनुभव येताच आपण श्रीसाईबाबांच्याविषयी खरोखरच कितीतरी चमत्कार लिहून त्यात त्यांची कीर्ती किती अमर्याद आहे हे दाखवू शकतो !

एप्रील १९७८ मध्ये माझी एस. वाय. बी. कॉम. ची परीक्षा होती. मी दरवर्षी माझ्या बाबांकडून (वडिलांकडून) परीक्षेच्या आधीच्या गुरुवारी उदीभस्म घेते; पण ह्या वर्षी माझे बाबा (वडील) मुंबईला गेले होते. मी त्यांना पत्राने कळविले होते की बाबा तुम्ही मला न विसरता उदी पाठवा. त्यांनी मला उदीभस्म पाठविले; पण परीक्षेच्या दिवसापर्यंत उदीभस्म मिळाले नाही. मी खूप निराश झाले व मला वाटले ह्यावर्षी मला माझ्या परीक्षेत यश मिळणार नाही. थोड्या वेळाने मी परीक्षा देण्यास निघाले. तो काय आश्चर्य ! शिरडीचे उदीभस्माचे व प्रसादाचे बुकपोस्ट मला पोस्टमनने दारातच दिले. माझ्या डोळ्यात आनंदाश्रू आले, व क्षणभर मला वाटले, श्री साईनी स्वतःहून येऊन मला उदीभस्म दिले. श्रीसाई माझी पाठीराखेच आहेत. मला उदीभस्म मिळताच खूप आनंद झाला व वाटले—

॥ जया मनी जैसा भाव तया तैसा अनुभव ॥

उदीच्या प्रभावामुळे विंचू दंशावर त्वरीत उतार

— श्री. रामजी गुणाजी पारटकर
मु. पवना, पो. दुधड, व्हाया
हिमायतनगर, जि. नांदेड.

● ३ फेब्रुवारी १९७७ रोजी सांयकाळी ७ वाजता साईबाबांची आरती आमचे घरी झाली. त्यानंतर थोड्याच वेळात माझा मोठा मुलगा आनंदराव हा मोठमोठ्याने रडत व कण्हत होता. त्याला काय झाले हे काही समजेना. प्रकाश टाकून सर्वत्र पाहिले असता एक भला मोठा विंचू पळत जाताना दिसला. तेव्हा समजले की माझ्या मुलास नक्की विंचू चावला आहे. तेव्हा मी त्वरीत माझ्या संग्रहात असलेली शिर्डीहून आणलेली साईबाबांची उदी मुलाच्या चावलेल्या भागावर चोळली व मुखाने साईनामाचा जप केला. तसेच मुलासही साईंचे नाम घ्यावयाचा प्रयत्न कर असे सांगितले. फक्त १ मिनीटच झाला असेल तोच माझा मुलगा एकदम हसायला लागला. तो म्हणाला बाबा, मला उदी लावण्याचे अगोदर भयंकरच त्रास झाला व उदी लावल्यानंतर मात्र त्रास एकदमच बंद झाला. काय ही साईंच्या उदींची किमया !

★ ★ ★

उदी आणि साईनामाचा गजर

—सौ. उज्ज्वला साठे,
११९ सदाशिव पेठ, पुणे ३०.

● मी ता. ११ सप्टेंबर पासून आजारी होते. ५।६ दिवस ताप येत होता. ताप नॉर्मलवर शुक्रवारी आला. पण घाम नव्हता. दुसरे दिवशी शनिवारी संध्याकाळी ६ चे सुमारास एकदम हातापायास मुंग्या म्हणा नाहीतर वीजेचा करंट म्हणा अशी सुरवात झाली. माझ्या तोंडून शब्दही बाहेर पडणे मुष्कील झाले. वैद्याचे (आयुर्वेदाचे) वर माझा विश्वास होता, व ते औषध मला मानवत होते. म्हणून तेच चालू होते. ताप नॉर्मल आल्यामुळे वैद्य २।३ दिवसांचे औषध देऊन परगावी गेले. आमचे घरात ज्याना आम्ही मानतो ते आराध्य दैवत (व्यक्ती) सकाळी १० वाजता मुंबईस गेलेले.

माझी प्रकृती तर एकदम बिघडली. आई वडील दोघेही जवळ बसून हातपाय शेकू लागले. मी त्याना काहीच बोलले नाही फक्त मनाशी एवढेच ठरविले, की वैद्य नाहीत. घरची पाठबळ शक्तीही परगावी. तेव्हा इच्छाशक्तीवर तग धरली. मी आईला वैद्यांचे घरी पाठवून वैद्यांची बहीण डॉक्टर आहे तिला बोलावून उपचार करूया. पण ती डॉ. ची बहीणही त्यांचेबरोबर परगावी गेल्याचे कळले. निराशा झाली. पण वैद्यांच्या मिसेस डॉक्टर आहेत हे त्यावेळी समजले. थोडी आशा निर्माण झाली. त्यांचेकडून पुड्या आणून उपचार चालू केले. तोपर्यंत गरम पाण्याचे बाटलीने शेकण्याचे काम चालूच होते. माझी मुलगी बाहेर गेली होती. ती येऊन मला भेटेल की नाही यांची शंका येऊ लागली. मी वडिलांना दर्शविले नाही. माझ्या समोरच प. पूज्य दासकिसन बाबा (साईबाबांचे परमभक्त) यांचा फोटो समोर भिंतीला लावलेला होता. माझ्या लग्नाच्यावेळीही त्यांची कृपाच उपयोगी पडली. ते वेळी त्या हयात होते. त्याना मी कळकळीने विनंती केली की, आपल्या उदीचा चमत्कार इतरांना येतो तर आता या क्षणाला. माझी अवस्था आपण जाणता. माझी सासरची येथे कोणीच नाहीत. डॉक्टरचे इंजेक्शन मी घेण्याचे टाळले. खरे कारण म्हणजे, मला जगण्याची इच्छा नव्हती. आईवडिलांना अपयश येऊ नये म्हणून मी दासकिसन बाबांचेकडे पाहून म्हटले 'आपण सर्व जाणता, काय करायचे ते करा.'

आमचे घरी श्रीसाईलीला मासिक येते. त्याचा अंक मी नुकताच वाचला होता. ती आठवण झाली. माझे तोंडून एकदम दोन ओळी चालू झाल्या "साई नामाचा गजर करा, नित्य मनाने त्यास स्मरा" यापूर्वीच मी साईबाबांची उदीचे पाणी प्याले होते उशाला बाबांची उदीची पुडी होतीच.

मनात संकल्प केला की मी गिरगावमधील श्रीसाईबाबांच्या स्थानाला (दासकिसनबाबांची साईबाबांचे पुजेची जागा) व शिर्डीला येईन व दर्शन घेईन पण मला आराम पडला पाहिजे. आमचे घरातील आराध्य दैवत म्हणून मानलेली व्यक्ती मुंबईहून परत घरी येऊन दाखल झाली. त्यास पाहून मी निजल्या ठिकाणापासूनच हात जोडून नमस्कार केला. पाठोपाठ माझी आईही औषध घेऊन आली. आमचे फॅमिली डॉक्टरांनी औषध देणेचे नाकारले. कारण डॉक्टरी औषध मला मानवत नव्हते, व इंजेक्शन देऊन रिॲक्शनग्लानी येईल ती माझ्या ॲनिमीक कंडीशन क्षीणता यास झेपणारी नव्हती. पण ते तपासून गेले. आई वडील यांनी रात्र जागून काढली. माझ्या मनात "साई नामाचा गजर करा," या ओळी येत व मी त्या म्हणे

त्यावेळी हातापायाची आग थांबे व ओळी म्हणणेचे थांबले की आग होऊ लागली असे दुसरे दिवसापर्यंत चालू होते. मी "साईनामाचा गजर करा" या ओळी श्री साईबाबांचेवर विश्वास ठेवून मनात म्हणणे चालूच ठेवले.

वास्तविक श्रीसाईबाबांची उपासना आमचे वडिलांचे घरी गेली वीस वर्षे आहे. माझी त्यांचेवर श्रद्धाही आहे. पण माझ्यावर बाबांच्या उदीचा त्यावरील श्रद्धेचा अनुभव किंवा प्रचिती घेण्याची वेळ कधीच आली नव्हती, ती यावेळी आली.

मला उतार पडल्यापासून दोन दिवसात श्री. त्रिं. ब. साठे हे दुपारी ३ वाजता आमचे घरी शिर्डीची श्रीसाईबाबांची उदी व प्रसाद घेऊन आले. गेली २५ वर्षे आमच्या घराशेजारीच ते रहात होते. पण ते आज प्रथमच आमचे घरी आले. मी मनोमन जाणले, की श्रीसाईनामाचा गजर केल्याने व बाबांना आर्त होऊन हाक मारली तर बाबा भक्तांचे रक्षण, कोणाचे करवी उदी देऊन संरक्षण करतात ही प्रचिती आली. या मला आलेल्या बाबांच्या प्रचितीमुळे माझी श्रद्धा दुणावली. श्रद्धा व सबुरी धरली. त्याला प्रचिती आली. हा साईनामाचा प्रताप.

●●●

श्री साईनाथ व उदी

— श्री. विजयकुमार हेजीब, मेकेनिकल इंजिनियर,
१३/२२ डब्लू. इ. ए. करोल बाग,
नवी दिल्ली–११०००५.

● श्री साईबाबांवर माझी नितांत श्रद्धा आहे. श्री साईनाथ माझ्याशी कित्येकदा पुटपुटतात. मी जेव्हा अनन्यभावांनी श्री साईनाथांना वंदन करून विचारतो. तेव्हा ते माझ्याशी उत्तर रूपात पुटपुटतात व विशेष म्हणजे ते अक्षरशः खरे होते. हा केवळ उदीचाच महिमा आहे. त्यांचे अनुभव मला नेहमीच येत असतात.

१. त्या गोष्टीला जवळ जवळ दोन वर्षे उलटली आहेत. मी फरीदाबादमध्ये एका खाजगी कारखान्यात सुपरवायजर कम शिफ्ट इनचार्ज म्हणून काम करीत होतो. मला तिन्ही शिफ्ट्समध्ये काम करावे लागे. त्यावेळेला मी दिल्लीत आश्रमच्या बसस्टँडवर सकाळी ६·३० पासून ७ वाजेपर्यंत फरीदाबादला जाण्याकरता

उभा होतो. दररोज ह्या अर्ध्या तासात सुमारे ३–४ बसेस येतात. पण त्या दिवशी फरीदाबादला जाण्याकरिता एकही बस आली नाही. माझी कामाची वेळ सकाळी ७·३० पासून होती. ज्या बसस्टँडवर मी उभा होतो त्या बसस्टँडवरून मला कारखान्यामध्ये पोचायला बसने सुमारे ३५ मिनिटे व पुढे पायीपायी १० मिनिटे म्हणजे वेळेवर पोचणे जवळ जवळ अशक्यच होते. मी दररोज कामावर जाताना श्री साईबाबांना नमस्कार करून व त्यांची उदी कपाळाला लाऊन निघत असे. सुमारे ७ च्या सुमारास माझ्या मनात आले की, आपण श्री साईबाबांना मदत करावी अशी अनन्य भावाने प्रार्थना करावी म्हणजे ते नक्कीच आपल्याला मदत करतील म्हणून मी त्यांना प्रार्थना केली. त्याबरोबर श्री साईनाथांनी मला प्रेरणा केली की तू घाबरू नकोस, २ मिनिटाच्या आत तुला बस मिळेल व तू बरोबर ७·३० वाजता कारखान्यात पोहोचशील. मी त्यांना लगेच म्हणालो बाबा आता तरी सांगा की समोरून कोणत्या ठिकाणाहून बस येईल, तर त्यांनी प्रेरणा दिली की समोरून अर्थात व्हाया झोगलहून. (फरीदाबादला जाण्याकरता आश्रमला तीन ठिकाणाहून बसेस येतात, एक म्हणजे लजपतनगरकडून, एक झोगलहून व तिसरं ठिकाण म्हणजे इन्द्रप्रस्थ डेपोकडून) तुम्ही विश्वास ठेवा अगर नका ठेवू पण हे खरोखरीच सत्य झाले, बस बरोबर ७ वाजून २ मिनिटानी आली व ती झोगलहूनच आली. मी जेव्हा कारखान्यात पोचलो किती वाजले पाहिले तेव्हा खरोखरीच ७ वाजून ३० मिनिटे झाली होती. केवढी ही साईबाबांची कृपा ! अर्थातच मी कारखान्यामध्ये वेळेवर पोहोचलो व त्या दिवसांची माझी सुट्टी वाचली.

* * *

२. गेल्या वर्षाच्या में महिन्याचे दिवस होते. माझी ए. एम. आय. ई. सेक्शन 'बी' मेकॅनिकल इंजिनियरिंगची परीक्षा सुरू होणार होती. माझी अशी इच्छा की ह्या वेळेला ही परीक्षा पास करायचीच. त्याप्रमाणे मी शिफ्टस्मध्ये काम करूनसुद्धा अभ्यासाकरिता मेहनत सुरू केली. एका संध्याकाळी मी पूजा करीत असता मी साईं बाबांना म्हणलो की हे श्री साईनाथ माझा तुमच्यावर पूर्ण विश्वास आहे. माझी हीच प्रार्थना की मी परीक्षा पास व्हायलाच पाहिजे. माझे एकूण ५ विषय राहिले होते, अर्थात अजून ५ विषयात पास करून aggregate ५० प्रतिशत अंक मिळवणे भाग होते. म्हणजे जवळ जवळ अशक्यच होते. पण एका प्रख्यात वाक्यात सांगितलेले आहे की श्रद्धा ठेवा मी तुमच्यासाठी धावून मदत करीन. त्याप्रमाणे श्री साईबाबांच्या कृपेमुळे मी ही ए. एम. आय. ई. ची सेक्शन 'बी' ची परीक्षा पास करू शकलो. त्यांचे असे झाले :–

एका संध्याकाळी मी पूजा करत असताना श्री साईबाबांना म्हणालो हे साईनाथ मेहनत मी करीन यश तुम्ही मला द्या, त्यावर थोड्याच वेळानी श्री साईबाबांनी मला खालील प्रेरणा दिली :-

"तू दररोज सकाळी व संध्याकाळी प्रथम माझी उदी माझ्या कपाळाला लाव व मग तुझ्या कपाळाला, गळ्याला व थोडीशी तुझ्या तोंडांत घाल व मग मला साष्टांग नमस्कार करीत जा. तुझी मनोकामना पूर्ण होईल."

पुढे त्यांची प्रेरणा झाली की उदी कपाळाला व गळ्याला लावलीस म्हणजे तुझ्या डोक्यात चांगला अभ्यास ठसेल व अभ्यासाची गतिपण वाढत जाईल तसेच तोंडात घातलीस म्हणजे तुला अभ्यासामुळे कोणताही अशक्तपणा येणार नाही व तू कधी आजारी पण पडणार नाहीस.

दुसऱ्या दिवसापासून मी श्री साईबाबांनी सांगितल्याप्रमाणे करू लागलो. हे जेव्हा माझ्या घरच्या लोकांनी पाहिले तेव्हा ते म्हणाले की तू हे काय वेडयासारखे करतो आहेस, पण माझी श्रीसाईबाबांवर असीम श्रद्धा होती व आहे. मी हा क्रम सगळ्यांकडे दुर्लक्ष करून चालूच ठेवला. परिक्षेचे दिवस उजाडले. एकामागून एक पेपर होत गेले. पण एक पेपर अवघड गेला. मनी म्हणालो की शेवटी जे व्हायचे तेच होणार असे दिसते व मला एखादेवेळस पुन्हा परीक्षेत बसावे लागणार. मी लगेच श्री साईबाबांना म्हणालो की हे बाबा तुमची माझ्यावर एवढी कृपादृष्टी असून सुद्धा असे का व्हावे. त्यावर श्रीसाईबाबांनी मला एवढीच प्रेरणा दिली की, मुला मी तुला सांगितल्याप्रमाणे तू तसाच क्रम चालू ठेवीत जा. ऑगस्ट महिना उजाडला. माझा निकाल आला. निकाल पाहून अक्षरशः नवलच वाटले की मी पूर्ण ए. एम. आय. ई.चा सेक्शन 'बी' पास झालो होतो. जो पेपर माझा अवघड गेला होता त्या विषयात मला ३८।१०० मार्क मिळाले होते. ह्या विषयात मला पास होण्याकरिता ३५ अंक हवे होते. केवढी ही श्रीसाईबाबांची कृपा ! मी लगेच थोडया दिवसांनी श्रीसाईबाबांची व श्रीसत्यनारायणाची व्यवस्थितपणे पूजा केली. श्रीसाईबाबांच्या प्रेरणेप्रमाणे मी उदीचा हा क्रम अजून चालू ठेवला आहे व हा क्रम चालू ठेवीन. ह्या घटनेला आता १ वर्ष ९ महिने झाले आहेत पण मी श्रीसाईबाबांच्या प्रेरणेप्रमाणे दररोज सकाळी व संध्याकाळी उदी तोंडात घालू लागलो तेव्हापासून आत्तापर्यंत मी एकदाही आजारी पडलो नाही. याच्या आधी मी वर्षातून एकदातरी आजारी पडत असे. केवढी ही श्रीसाईबाबांची कृपा !

मंडळी तुम्ही विश्वास ठेवा अगर नका ठेवू पण ह्या दोन्ही गोष्टी अक्षरशः सत्य आहेत.

× × ×

श्रीसाईने वाचविले–उदीचा चमत्कार

—श्री. दत्तात्रय मोखरीवाले,
उदाजी की पायगा, जनकगंज, ग्वाल्हेर.

*दिवाळीचे दिवस. सकाळपासूनच मुलांचा गोंगाट सुरू झाला होता. पहाटे उठून स्नान करण्यापासून फटाक्यांचा आवाज, फुलझड्यांची चकमक, गगनचुंबी हवाईबाण यांच्या आवाजात मुलांचे खेळणे, ओरडणे वगैरे चालूच होते. स्नान करून फराळाची वेळ आली ! झाला परत मुलांचा गोंगाट सुरू झाला ! करंज्या, लाडू, पापड्या, वगैरे खाणे सुरू झाले, मग काय आनंदी आनंद पसरला.

संध्याकाळ झाली, लक्ष्मी पूजनाची वेळ आली. घरोघरी सजावटी सुरू झाल्या. आमचे घरी आम्ही मेणबत्तीची सजावट केली होती. प्रत्येक वर्षापेक्षा जास्त काही वेगळेपणा व्हावा म्हणून नेहमीपेक्षा जास्त आतिशबाजी केली होती. खास करून नळे, फुलझड्या, आतिशबाजीची रेल, हवाईबाण, सुतळी बॉम्ब वगैरे वगैरे ! पैकी "सुतळी बम" हे ग्वाल्हेरचे वैशिष्ट्य म्हणून जास्त प्रमाणात घेतले होते ! मी स्वतः मुलांना सक्त ताकीद दिली होती की, आतिशबाजी माझ्या समोर करावी व मी जसे सांगेन तसे करावे ! त्याप्रमाणे मुलांनी ऐकले व केले ! बरीच आतिशबाजी केली व थोडी दुसऱ्या दिवसासाठी राखून ठेवली. लक्ष्मी पूजनाचे नंतर हळद कुंकू व पानसुपारी घेण्यासाठी मित्रमंडळींचे येणे जाणे सुरू होते ! मी मित्रमंडळीस पान-सुपारी देत होतो. तेवढ्याच वेळात माझा मोठा मुलगा अजय (वय सुमारे ११ वर्षे) ह्याने एक सुतळी बम घेतला, व त्या बमास पेट देण्याचा प्रयत्न केला ! त्याच्या हातून तो बम चालला नाही, म्हणून दुसरा बम घेतला व त्याला पेटविणारच होता, तेवढ्यात पहिल्या बममधून आतिषबाजीचा गॅस सरळ अजयच्या दोन्ही डोळ्यात गेला ! त्याला काहीच दिसेना ! आम्ही सर्व घाबरलो व घरात पेरण्याच्या वाऱ्यात पलंगावर मुलास झोपविले व डोळ्यात मलम घातले. परंतु काही केल्या त्याला चैन पडेना व डोळ्यानेही दिसेना ! डॉक्टरला बोलवावे असे मित्रांनी सुचविले. परंतु तेवढ्यात माझ्या डोक्यात प्रकाश पडला व मी एक क्षण श्री साईमहाराजांच्या मूर्तीकडे बघितले, जणू ते मला सांगत होते की, "अजयच्या डोळ्यास फक्त उदी लाव" सर्व ठीक होईल. लगेच मी, श्रीसाईमहाराजांचे मूर्तीपुढील उदी घेतली व मुलाच्या दोन्ही डोळ्यांना लावली ! श्री साईमहाराजांच्या कृपेने उदीच्या रूपात साक्षात बाबाच तेथे आले व त्यांनी डोळ्यात ज्योत दिली ! थोडया वेळानंतर त्याला नीट दिसू लागले ! श्रीसाईबाबांची उदी लावल्यानंतर अजयचे डोळे कोणत्याही डॉक्टरला दाखवावे लागले नाहीत किंवा ट्यूब घालावी लागली नाही ! असा श्री साईबाबांच्या उदीने चमत्कार दाखविला. ●

उदी आणि संदीपचा ताप

—श्री. एकनाथ एम्. मेस्त्री, मोतीलालनगर,
गोरेगाव, मुंबई—४०००६२

● रविवार दिनांक २५।१२।१९७७ रोजी रात्रौ ९ वाजता माझा चि. संदीप वय १४ वर्षे हा अचानक तापाने आजारी झाला. चक्कर व ऊलट्या होऊ लागल्या. त्वरीत डॉक्टरना आणले. त्यांनी ताप वगैरे तपासून इंजेक्शन दिले; व म्हणाले थोड्या वेळाने आराम वाटेल, तुम्ही काही काळजी करू नका. परंतु त्याच्या ऊलट्या चालूच होत्या. रात्रौ १२–२० वाजले पण थांबण्याचे काही चिन्ह दिसेना. तेव्हा माझ्या सौ. ला एकदम बाबांच्या उदीची आठवण झाली. लगेच तिने उदीचा टीळा संदीपच्या कपाळी लावला व थोडी त्याच्या तोंडांत टाकली. त्याबरोबर थोड्याच वेळात उलट्या थांबून ताप कमी होत गेला. व त्याला आराम वाटला. तसा तो झोपी गेला. सकळी पुन्हा पूर्वीसारखा खडखडीत वाटू लागला. अशी बाबांची कृपा लाभली आम्हाला. म्हणून श्रीसाईबाबांना त्रिकाळ चरणी मस्तक ठेवून वंदन करतो.

★

श्री साईबाबांची उदी–संजीवनीचा चमत्कार

— श्री. संजय वसंत फरकांडे

● मी व माझे नातेवाईक मनोहरराव परवान आम्ही दोघे काही कामानिमित्त आगष्ट महिन्यात अमरावतीला गेलो होतो. तेथे माझे मित्र कालुरामजी अढाळगे मनोहर बँडचे मालक हे मला भेटले. त्यांनी आम्हाला घरी जेवायला दोघाना आमंत्रण केले. त्याप्रमाणे आम्ही दुपारी १२–१ वाजता मित्रासोबत त्यांचे घरी जायला निघालो. मित्राचे गाव वलगाव. हे अमरावती शहरापासून थोडे ५–६ मैलावर आहे. त्यांचे घरी एस. टी. किंवा मोटार मार्ग आहे. त्याकरिता आम्ही तिवेही अमरावती एस. टी. स्टँडवर आलो. आम्हाला जी एस. टी. पाहिजे होती तिला येण्याकरिता थोडा वेळ होता. म्हणून आम्ही एस. टी. स्टँडवर बसलो. त्या दिवशी गुरुवार होता. माझे मित्र सुद्धा सांईभक्त आहेत. तेवढ्यात तेथे ४० ते ५० वर्षाचे एक म्हातारे गृहस्थ व त्यांची मुलगी अशी ते सुद्धा त्याच एस. टी. ची वाट पहात बसले होते.

तेवढ्यात त्या गृहस्थांना सहज विचारले की तुम्ही कोठे जाता. कोणत्या गावाला राहता अशी चौकशी केली. त्यांनी सुद्धा माझ्या प्रश्नाचे व्यवस्थित उत्तर दिले. त्यांचे सोबत त्यांची मोठी मुलगी होती. त्या बाईजवळ एक १–२ वर्षांचा लहान मुलगा होता. तो लहान मुलगा अत्यंत आजारी होता. मी त्यांना विचारले की या मुलाला काय झाले ? त्यांनी सांगितले की याला लिव्हरचा रोग आहे. त्या मुलाचे पोट फार मोठे झाले होते. पोटात पाणी झाले असे डॉक्टरांनी सांगितले आहे. (संग्रहणी रोग सुद्धा म्हणतात.) १ वर्षापासून आम्ही चांगल्या डॉक्टरकडून इलाज औषधोपचार केला पण अजून बरा नाही. शेवटी अमरावतीचे वालतश डॉ. राठीने सांगितले की याला नागपूरला चांगल्या तज्ञाकडून तपासून औषध उपचार करा. त्याप्रमाणे आम्ही या मुलाला नागपूरला घेऊन गेलो. तेथे ४–५ दिवस ठेऊन त्या डॉक्टरांनी सांगितले की तुम्ही या मुलाला घरी घेऊन जा. कारण हा मुलगा बरा होऊ शकत नाही. त्याप्रमाणे आम्ही या मुलाला आज घरी घेऊन आलो आहे.

तेव्हा मी त्यांना म्हणालो की तुम्ही एवढा खर्च केला व त्रास घेतला, तर आता शेवटचा उपाय मी सांगतो.

जर तुमची श्रद्धा असेल तर सांगतो, तेव्हा ते गृहस्थ म्हणाले की, सांगा. शेवटचा उपाय तो सुद्धा करून पाहू.

मी त्यांना सांगितले की या मुलाला श्री साईबाबांची उदी पाण्यात टाकून आताच पाजा, व कपाळाला उदी लावा. आपच फरक पडेल. जर तुमची श्रद्धा साईबाबांवर असेल तर आजच शिर्डीला साईबाबांचे दर्शनाला या मुलाला घेऊन जा.

त्याप्रमाणे त्या मुलाला मजजवळची उदी दिली. खरोखरीच बाबांची लीला अगाध आहे. त्या उदीने मुलगा अगदी बरा झाला व आज आनंदात खेळत आहे. त्या मुलाला शिर्डीला दर्शन करून आणले.

अशाप्रकारे बाबांचे उदीने लहान मुलाला नवजीवन प्राप्त झाले. बाबांची उदी म्हणजे संजीवनी आहे.

☆

कृतांताच्या दाढेतून। काढीन मी निज भक्ता ओढून॥

— श्री. लक्ष्मण गणपत पै,
१४३ डी लेडी जमशेटजी रोड,
तळ मजला, माहीम,
मुंबई नं. ४०००१६

● हया श्री बाबांच्या उक्तीप्रमाणे माझ्या भावाच्या जिवावर आलेल्या भयंकर संकटातून श्री साईनाथांनी मुक्तता केली. आम्हाला त्यांनी सदैव ऋणी करून ठेविले आहे. हा अनुभव आम्हाला जसा आला, तसाच तो मी आपल्या सर्वांसमोर मोठ्या आनंदाने देत आहे.

माझा भाऊ गोपाळ हा इंडीया युनायटेड मिलमध्ये कामाला आहे. ता. ३०-१०-७७ रोजी त्याच्या जिवावर भयंकर मोठे संकट आले. त्या दिवशी नेहमीप्रमाणे सकाळी मिलमध्ये कामावर गेला असता, त्याला कामावर एकाएकी अस्वस्थ वाटू लागले व तो अचानक झटका बसल्यासारखे करू लागला. इकडून तिकडे येरझाऱ्या मारू लागला व कोणाशी बोलेना. त्याला आपण काय करीत आहोत याचे भान देखील नव्हते. त्यांनी मिलच्या कँटीनमध्ये धमाल केली. त्याचे चमत्कारीक वागणे पाहून त्याच्या मित्राने त्याला घरी आणून सोडले.

घरी आल्यावर तो एकाएकी कोणास काही न सांगता घराबाहेर निघून गेला आणि समुद्र चौपाटीवर फिरू लागला. चौपाटीवर त्याची स्थिती आणखीनच चमत्कारिक झाली. त्याने आपल्या अंगावरचे सर्व कपडे काढून समुद्रात फेकले व हातातील घड्याळ व जानवेसुद्धा काढून समुद्रात फेकून दिले. तो वेड्यासारखा समुद्राच्या पाण्यात आत गेला व गळ्यापर्यंत पाणी आले तरी त्याला मी कोठे चाललो आहे त्याचे भानच नव्हते. त्याचवेळी समुद्रात पडावात असलेल्या कोणी एका कोळयाने त्याला अशा स्थितीत पाहून माझ्या भावाला त्यांनी आपल्या पडावात ओढून घेतले व त्याला किनाऱ्यावर आणून सोडले. किनाऱ्यावरील वाळूत तो या स्थितीत किती वेळ पडून होता ते त्याला आठवत नाही. रात्रौ नऊच्या सुमारास आमच्या शेजारी राहणाऱ्या मुलांनी माझ्या भावाला समुद्र किनाऱ्यावर पडलेला पाहिला व त्या मुलांनी घरी येऊन त्याचे कपडे आणून त्याला कपडे घालून, घरी आणून सोडले. घरी आल्यावर त्याच्या वागण्यात काही फरक पडला नाही.

पहाटे चारच्या सुमारास पुन्हा त्याला झटका बसल्यासारखे झाले व तो उठून येरझारा घालू लागला. झोपण्याचा प्रयत्न केला पण त्याला झोप बिलकुल आली नाही.

दुसऱ्या दिवशी ता. ३१-१०-७७ रोजी दसऱ्याच्या दिवशी तो जास्तच बेफामपणे हातवारे करून आदळ आपट करू लागला. आरडाओरड करू लागला, त्यामुळे त्याला दोरीनी बांधून ठेवावे लागले. शेजारी पण कंटाळून गेले. मी तर फारच गोंधळून गेलो. काय करावे ते काहीच मला समजेना. माझ्या मनात शंका आली. माझा याच्यापेक्षा मोठा भाऊ देखील अशा झटक्यामुळे वेडा झाला व त्यातच त्याचा अंत झाला. मी देखील विचार केला की माझा हा भाऊ गोपाळ देखील आता वेडा होवून माझ्या मोठ्या भावाप्रमाणे याचे देखील होईल व मी एकाकी पडेन. कारण आता आम्ही दोघेच भाऊ व म्हातारे वडीलांचा बोजा सर्व माझ्यावर पडेल या सर्व विचारानी मी फारच भयभीत झालो. काही जणानी सुचविले की मांत्रिकाना बोलवा. पण तो चारचौघा जणाला देखील आवरत नव्हता. काही जणांच्या सल्ल्याप्रमाणे मी पोलीस वायरलेसला बोलावून त्याला हॉस्पीटलात दाखल करण्याचे ठरविले व त्याप्रमाणे मी फोन देखील केला.

साईबाबांची लीला अगाध. ते आमच्या संकटास धाऊन आले. माझी अशी धावपळ उडालेली पाहून आमच्या चाळीत असलेल्या आम्ही सर्व वहिणी म्हणून त्यांना मानतो. त्या वहिनी साईबाबांची सेवा भक्ती करतात व दर गुरुवारी नित्य नेमाने साईबाबांची आरती करून बाल गोपाळांना प्रसाद, तिर्थ उदी वाटतात. सौ. वहिनींनी मला बोलावून सांगितले, वायरलेसच्या वगैरे भानगडीत न पडता, मी तुला श्रीसाईबाबांची उदी बाबा समोर प्रार्थना करून देते. ती तू त्याला पाण्यात घालून पाज व त्याच्या डोक्याला बाबांचे नाव घेऊन उदी लाव. नंतर आज दसरा आहे व दुपारी बाबांची आरती आहे त्यावेळी आरतीस ये.

मी बाबांची उदी ताबडतोब घेऊन कशीबशी करून त्याला पाण्यात घालून पाजली व बाबांचे नाव घेवून त्याला उदी लावली. त्याबरोबर त्याचे झटके सौम्य झाले. तसेच सौ. वहिनीने सांगितल्याप्रमाणे मी दुपारी बाबांच्या आरतीसाठी गेलो. श्रीबाबांची आरती झाल्यावर सौ. वहिनी बाबांची हजेरी लावतात (बाबांचा संचार होतो) त्या वेळेस त्यांनी मला सांगितले की तुझी आई वारल्यापासून तू तिचे क्रीया कर्म (श्राद्ध) वगैरे काहीच करीत नाहीस तेव्हा तू आता तुझ्या आईची क्षमा माग आणि समोर नवरात्र उत्सवासाठी दुर्गामातेची स्थापना चालू आहे व त्यांचा उत्सव आहे. तेव्हा तिथे आईची प्रार्थना कर, हा संध्याकाळी शांत होईल.

मी त्यांच्या आज्ञेप्रमाणे मी आमच्या घरासमोर दुर्गामातेचा दसरा उत्सव चाललेला होता त्या ठिकाणी जाऊन प्रार्थना केली. खरोखरच आश्चर्य वाटले की मी बोलावलेली वायरलेस परत गेली, व माझा भाऊ गोपाळ संध्याकाळच्या आत बाबांच्या आज्ञेप्रमाणे शांत झाला. स्वतः खायासाठी मागितले, आणि बाबांची उदीसुद्धा स्वतः होवुन घेतली, आणि साईबाबांचे नामस्मरण करू लागला.

संध्याकाळी मी देवीला ओटी पुजा अर्पण केली. संध्याकाळी सौ. वहिनींच्या घरी श्रीसाईबाबांच्या मुर्तीला चार नारळ पेढे अर्पण करून रात्रौ बाबांच्या आरतीचा व प्रसादाचा लाभ घेतला.

सौ. वहिनीने जर या प्रसंगी श्रीसाईबाबांची उदी दिली नसती तर मी वेडया-सारखा भलतीकडेच उपचारासाठी भटकलो असतो, व माझ्या भावावर (गोपाळवर) सर्वनाशाचा प्रसंग ओढवला असता.

आता माझा भाऊ श्रीसाईबाबांचा इतका निस्सीम भक्त बनला आहे की तो सदैव श्रीबाबांचे नाव घेत असतो. जेवणातून पाण्यातून बाबांची उदी घेतो व उदी अंगाला देखील लावतो. श्रीसाईबाबांच्या कृपेमुळे. माझ्या भावाला सर्वनाशा पासून व काळाच्या दाढेतून ओढून काढले आहे. तो पूर्ववत आपल्या कामास जातो.

उदीचा महिमा

साईच्या उदीचा महिमा वर्णू किती
ती तर जीवांची संजीवनी
उदी नव्हे–ही तर विभूति
जड जीवांची प्राणाची 'प्रणवबती'
हिच्या स्पर्शाने हरे दुःख व्यथा
ही भाळी लाविता ज्ञान ज्योत उजळे तत्वता
हिच्या कणाकणांत साईरमला
हिच्या स्पर्श नव्हे तो तर साई गमला
अंतरीची प्रजवलीत झाली संवेदन हिच्या स्पर्शाने
जन्मांतरीचे दुःख निमाले साईच्या उदीने.

— **सौ. कलावती वसंतराव चव्हाण,** दादर

लेखक–कवी पंचम स्नेहसंमेलन, शिर्डी

श्रीसाईलीलेच्या लेखक कवींचे पंचम स्नेहसंमेलन जानेवारीच्या २८, २९ या तारखांना शिर्डी येथे भरविण्यात आले होते. १९७५ झाली अशा स्वरूपाचे संमेलन प्रथमच भरविण्यात आले, यंदाचा हा लेखक कवींचा एकत्र मेळावा अतिशय उत्साहाने, जिद्दीने दोन दिवस एकत्र आला व हा सोहळा अत्यंत सुव्यवस्थितपणे, यशस्वीपणे पार पडला ही आनंदाची गोष्ट होय.

या संमेलनास श्रीसाईलीलेच्या इंग्रजी तथा मराठी अंकातून अधून मधून व नियमितपणे काव्य व लेखन करणारी अशी सुमारे ६५ स्त्रीपुरुष लेखक मंडळी हजर होती. मुंबईहून श्री. इनामदार, श्री. खडके, श्री. रसाळ, श्री. रमाकांत पंडित, श्री. व कु. जुवळे, श्री. श्रीराम सातर्डेकर, श्री. वासुदेव सकपाळ, श्री. विजय हजारे, श्री. माधव गोरे, राधाकृष्ण गुप्ता, श्री. वसंतराव व सौ. कलावती चव्हाण, श्री.. एन. जी. परुळेकर, पुण्याहून प्रा. श्री. पुजारी, सौ. लीलाताई पुजारी, श्री. जगन्नाथ कुलकर्णी, श्री. मोरे, श्री. व सौ. सांडभोर, श्री. श्रीराम आठले, श्री. व सौ. गर्जे, डॉ. सौ. सुमती खानविलकर लोनावळा, नगरचे श्री. अ. ज. व ग. ज. चिंतांबर, धुळ्याहून श्री. रमेश चव्हाण, श्री. जगदीश देवपुरकर, डी. बी. जगतपुरीया, श्री. नागेश मोगलाईकर, श्री. हसमुख पाटील, श्री. प्र. अ. पुराणिक, फणसा येथून श्री. ढापरे, बिदरहून प्रा. गुंडेराव पटवारी, पिंपरीहून श्री. डी. बी. पोतनीस, इंदूरहून श्री. व सौ. बापूसाहेब निरखे, श्री. प्रकाश कर्पे, खुद्द शिरडीची श्रीमती लीलाताई गुजराथी, सौ. उषाताई मुळे इ. लेखक–कवी मंडळी हजर होती.

संमेलनाला सुरुवात साईभक्त प्रा. र. श्री. पुजारी पुणे यांची कन्या कु. जयश्री हिने गायिलेल्या स्वागत गीताने झाली. "या बंधूनो ! या भक्तांनो ! वंदन या शुभकाळी

माय आपुली प्रिय, शिरडीची आशीर्वादा आली," हे तिच्या स्वागत गीताचे सुरुवातीचे बोल होत.

स्वागत गीतानंतर श्रीसाईलीला मासिकाच्या इंग्रजी आवृत्तीचे का. संपादक डॉ. श्री. दि. परचुरे यांनी उपस्थितांचे स्वागत केले व न्यायालयधारक श्री. काकरे-साहेब यांनी या अपूर्व स्नेहसंमेलनाचे उद्घाटन केले. आपल्या उद्घाटनपर छोट्याशा भाषणात त्यांनी संमेलनाचा हेतू उद्देश समजावून सांगितला. नंतर साईलीला मासिकाच्या मराठी आवृत्तीचे का. संपादक श्री. सदानंद चेंदवणकर यांनी संमेलनाचे अध्यक्ष डॉ. गजाननराव दाभोलकर, मुख्य पाहुणे, महामना वंदनीय श्रीराधाकृष्ण स्वामी, अध्यक्ष अखिल भारतीय श्रीसाईसमाज, बंगलोर-मद्रास, न्यायालयधारक



श्रीसाईलीला लेखक-कवी पंचम स्नेहसंमेलनात न्यायालयधारक श्री. क. ही. काकरेसाहेब भाषण करीत असताना, शेजारी अध्यक्ष डॉ. गजाननराव दाभोलकर व त्यांचे शेजारी मुख्य पाहुणे श्री. राधाकृष्णस्वामीजी.

श्री. क. हि. काकरेसाहेब व संस्थानचे नवे कार्यालय प्रमुख श्री. द. चिं. पाठकसाहेब यांचे परिचय थोडक्यात करून दिले.

या कार्यक्रमानंतर गतवर्षातील दिवंगत साईभक्तांना मिनिटभर उभे राहून मूक श्रद्धांजली वाहण्यात आली.

यानंतर साईलीला मासिकाच्या फेब्रुवारी १९७९ च्या साईकाव्यबहार या खास अंकाचे प्रकाशन अध्यक्षांचे शुभहस्ते होऊन ज्या कवींच्या कविता या अंकात समाविष्ट केल्या गेल्या होत्या त्यांना अध्यक्षांचे हस्ते भेट अंक देण्यात आला.

या कार्यक्रमानंतर उपस्थित असलेल्या साईभक्त लेखक-कवींचे हसत खेळत आपापला परिचय करून देण्याचे कार्यक्रम झाले. या कार्यक्रमप्रसंगी अनेक कवींनी उत्स्फूर्तपणे शेरोशायरी केली. विशेष म्हणजे या कार्यक्रमास तिसऱ्या व चौथ्या स्नेहसंमेलन प्रसंगीचे अध्यक्ष श्री. अ. ज. चितांबर व श्री. ग. ज. चितांबर अहमदनगर हे उभय बंधू उपस्थित होते. चहापानानंतर दुपारच्या अधिवेशनाचा कार्यक्रम समजावून सांगण्यात आला व संमेलनाचे पहिले सत्र सुमारे १२ वाजता संपले. आरती व प्रसाद ग्रहणानंतर विश्रांती झाली.

दुपारी साडेतीन वाजता दुसरे सत्र सुरु झाले. या कार्यक्रमास फक्त श्री साई भक्त लेखक कवींनाच निमंत्रित करण्यात आले होते. या अभिनव महत्त्वाच्या कार्यक्रमात वीसावर लेखक-कवींनी भाग घेऊन आपापल्या सूचना, मते मांडल्या.

श्री. ना. ग. परुळेकर, बोरीवली यांनी साईलीलेतील लेख व कविता यांची निवड करण्यासाठी व मासिकाचा कारभार व्यवस्थितपणे चालविण्यासाठी एक सल्लागार मंडळ असावे अशी सूचना केली. तसेच अंकातील स्वानुभव चमत्काराने भरलेले असतात व त्यामुळे अंकावर टीका होते. खास अंक काढू नयेत. साई समकालीन संत अंक उगाचच काढला. तो काढायचा म्हणून काढला. एका संतावर अवघ्या चार ओळीत माहिती होती. अशा प्रकारचे अर्थहीन विचार प्रगट केले.

श्री. डी. बी. जगतपुरीया, शिरुड, धुळे यांनी अंकात 'मंच' नावाचे नवे सदर सुरु करून त्यामधून साईबाबांच्या विचारांचीच गीते सादर करावीत अशी सूचना मांडली.

श्री. डी. आर. खडके, चेंबूर मुंबई यांनी मासिकाच्या खपाच्या दृष्टीने उपयुक्त म्हणून संस्थानने ठिकठिकाणी मासिकाच्या माहितीचे फलक लावावेत, ज्या ठिकाणी भक्तांची जा-ये अधिक असते त्या ठिकाणी संस्थानने आपल्या प्रकाशनाचे स्टॉल उघडावेत अशी सूचना केली.

श्री. नागेश दिवाकर पुणे यांनी भाषिक विभाजनाच्या संबंधीच्या सूचना केल्या, तर श्री. ढापरे फणसा (गुजरात) यांनी अंकात प्रांताप्रांतातील लेखकांचे बाबांचे विषयीचे लेख असावेत अशी सूचना पेश केली.

श्री. रमेश डी. हव्हाण, नवापूर यांनी साईलीलाचे सध्याचे स्वरूप अत्यंत सुंदर असून प्रत्येक अंकातून भक्तांचे बाबांविषयीचे अनुभव प्रसिद्ध करावेत व गुजराथी अंकाचे पण आता नव्याने प्रकाशन करावे अशी सूचना केली. मुंबईचे श्री. माधव गोरे म्हणाले, 'पंचवीस वर्षांपूर्वी शिरडीत काय झाले' अशा प्रकारचे सदर सुरु करावे. श्री. हसमुख ओंकार पाटील नवापूर यांनी हिंदी लिखाणाला मराठी व इंग्रजी आवृत्तीत फारच कमी स्थान मिळते यासाठी मासिकाची एक हिंदी आवृत्ती पण काढावी असे सांगितले. राधाकृष्ण गुप्ता चेतन यांनी पण हीच सूचना मांडली.

श्री. नागेश मोगलाईकर, धुळे यांनी संमेलनास यापुढे येणाऱ्या भक्तांची कुचंबणा होऊ नये म्हणून जागेच्या व्यवस्थेसंबंधीचे मार्गदर्शन करण्याची व्यवस्था व्हावी असे सुचविले. तसेच मासिकात आर्ट पेपरवर चित्रे द्यावीत, मासिकाची किंमत वाढवून पृष्ठसंख्या पण वाढवावी असे सांगितले.

प्रा. गुंडेराव पटवारी बिदर यांनी विश्वविद्यालयांना मराठी व हिंदी प्रती विनामूल्य पाठविण्यात याव्यात असे सांगितले.

श्री. प्र. अ. पुराणिक, धुळे यांनी संमेलनाच्या सुरुवातीला मंगलदीप प्रज्वलीत व्हावा. मावळत्या अध्यक्षांनी जगवत्या अध्यक्षांचे हाती तो दीप द्यावा. संमेलनास सुरुवात साईभक्तीपरगीताने व्हावी. तसेच यंदाच्या आंतरराष्ट्रीय बालक वर्षाच्या निमित्ताने संस्थानने येत्या १४ नव्हेंबरला बालकांचा एक मेळावा शिरडीस भरवावा अशी सूचना मांडली.

सौ. लीलाताई मराठे, धुळे यांनी साईलीलेतून जातक कथा, रुपक कथा पण छापाव्यात असे सुचविले.

डॉ. सौ. सुमती खानविलकर, लोनावळा यांनी संमेलन दरवर्षी व्हावे ते दोन दिवसांचे न होता तीन दिवसांचे असावे एक दिवसाची सहल काढावी. बाबांच्या वाणीतले विचार मासिकातून जरूर प्रसिद्ध करावेत. मासिकाची वर्गणी १०१ रु. घेऊन तहह्यात वर्गणीदार म्हणून कायम स्वरूपात अंक पाठवावा अशा स्तुत्य सूचना मांडल्या. श्री. अ. ज. चितांबर नगर यांनीही बाईची ही सूचना उचलून धरली. श्री. सांडभोर पुणे यांनी जुन्या संतांची माहिती मासिकातून द्यावी असे सांगितले.

श्री. गणेशपंत उर्फ आप्पासाहेब चितांबर नगर यांनी साईकाव्य संग्रह प्रकाशीत करावा. चांगल्या चांगल्या साईकविता टेपरेकॉर्ड करून ठेवाव्यात असे सांगितले तर पुण्याचे प्रा. र. श्री. पुजारी यांनी गेल्या चार वर्षातल्या प्रकाशित झालेल्या साईलीला मासिकाचा थोडक्यात आढावा घेऊन उत्तमोत्तम अंक प्रकासित केल्या बद्दल संपादकांचे अभिनंदन केले.

लेखक-कवींच्या बऱ्याचशा सूचनांची कार्यकारी संपादक श्री सदानंद चेंदवणकर व डॉ. परचुरे यांनी समाधानकारक उत्तरे देऊन त्यांची समजूत पटवून दिली. सायंकाळी ७ वाजे पर्यंत हा कार्यक्रम चालू होता.

सोमवारी दुसऱ्या दिवशी २९ जानेवारीला सकाळी ९–३० वा. भरलेल्या कवी संमेलनात श्रीराम सातर्डेकर, नागेश मोगलाईकर, सौ. कलावती चव्हाण, डॉ. सौ. खानविलकर श्रीमती लीलाताई गुजराथी, श्री. जगदीश देवपूरकर, प्रा. गुंडेराव पटवारी, सौ. लीलाताई मराठे, श्री. दत्तात्रय मोरे, श्री. पोतनीस इ. नी भाग घेऊन संमेलनाला एक अभूतपूर्व साज आणला. हा कार्यक्रम इतका रंगला की साऱ्यांनीच या कार्यक्रमाची मुक्त कंठाने प्रशंसा केली. ढोलकी पटू श्री. आप्पा सामंत हे या प्रसंगी हजर होते व त्यांनीही आपल्या हाताचे कसब येथे दाखविलेच.

सायंकाळी ४ वाजता या संमेलनाचा समारोप कार्यक्रमास सुरुवात झाली. सुरुवातीसच साईबाबा संस्थानतर्फे आलेल्या लेखक-कवींना हॉलंड चीजचा एक एक डबा, श्रीसाईं उदी, छोटा फोटो, एक श्रीफल व प्रा. परचुरे लिखित अभंग संकीर्तनाची एक प्रत प्रसाद भेटीदाखल दिली गेली.

प्रसाद वाटपानंतर अध्यक्ष महोदय डॉ. गजाननराव गोविंदराव दाभोलकर साईसच्चरित्रकार श्री. गोविंदराव दाभोलकर यांचे चिरंजीव मु. वांद्रे यांचे भाषण वाचून दाखविण्यात आले. हे भाषण पुण्याचे श्री. श्रीराम आठवले यांनी अतिशय सुंदरतेने वाचून दाखविले त्यामुळे त्यांच्या भाषणातील मजकूराचा ठसा, भाव श्रोत्यांच्या मनावर संपूर्ण उठला. अध्यक्षांचे भाषण याच अंकात इतरत्र देण्यात आलेले आहे. यानंतर प्रमुख पाहुणे श्रीराधाकृष्ण स्वामीजी यांनी इंग्रजी भाषण करून श्रोत्यांना शुभाशिर्वाद दिले. त्यांच्या भाषणाचा मराठी गोषवारा डॉ. परचुरे यांनी सादर केला.

यानंतर न्यायालय धारक श्री. काकरेसाहेब यांनी समारोपाचे भाषण केले. आपल्या भाषणात त्यांनी सुरुवातीलाच साईलीला लेखक-कवी स्नेहसंमेलन होणार नाही अशी पाल जी चुकचुकली होती ती बातमी सर्वस्वी निराधार आहे अशी स्पष्ट ग्वाही दिली इतकेच नव्हे तर हे संमेलन आजही होईल व पुढेही हा संमेलन कार्यक्रम योजिला जाईल असे सांगितले या संमेलनात लेखक-कवींनी मांडलेल्या सर्व सूचनांचा मी अवश्य विचार करीन असेही ते म्हणाले. विशेषतः साईलीलेची हिंदी, गुजराती, आवृत्ती, साईलीलेचा निबंध अंक, बालकवर्षानिमित्त मुलांचा मेळावा, साईलीलेच्या वर्गणीत वाढ या गोष्टींचा तर मी नजिकच्या काळात निकाल देईन असे ते म्हणाले. त्यांचे भाषण अतिशय आटोपशीर व मुद्यांना धरून होते. यंदाच्या वर्षी जे तक्ते लेखक कवींनी भरून द्यावयाचे आहेत त्या तक्त्याची कल्पना माझी असून त्याला सर्वस्वी जबाबदार आपणच आहोत असे त्यांनी जाहीर केले.

श्री. काकरेसाहेबांच्या भाषणानंतर लेखक-कवी मंडळींच्यातर्फे श्री. काकरे साहेब का. संपादक डॉ. परचुरे व श्री. सदानंद चेंदवणकर यांना पुष्पहार व स्टेनलेस स्टीलचे ग्लास देऊन सत्कार करण्यात आला. तसेच मंदीर प्रमुख श्री. बागवे व निवासस्थाने प्रमुख श्री. अवधूतराव शिंदे यांनाही पुष्पहार प्रदान करून सत्कार करण्यात आला. संमेलनात सर्व प्रकारची सुव्यवस्था व मार्गदर्शन करणाऱ्या कुमार सुभाष चेंदवणकर याचाही पुष्पमाला देऊन गौरव करण्यात आला.

या छोटाशा सत्कार समारंभानंतर व अधूनमधून गाण्याच्या कार्यक्रमानंतर लेखक-कवी मंडळींचेतर्फे प्रा. र. श्री. पुजारी, श्री. ना. ग. परुळेकर, प्रा. पटवारी व सौ. खानविलकर यांनी आभारपदर्शन केले.

शेवटी संस्थानतर्फे सर्वांचे आभार डॉ. श्री. दि. परचुरे यांनी मानले. आपल्या भाषणात त्यांनी संमेलन होणारच नाही अशी अफवा पुण्याच्या १७ व्या अखिल भारतीय साई समाजातर्फेच्या अधिवेशनात काही दांभिक विरोधकांनी पसरवली होती व संमेलन होणार नाही किंवा करू नये किंवा केलेच तर ते अशा अशा प्रकारे केले जावे अशी एका व्यक्तीची सतत पत्रे संपादक द्वय व न्यायालयधारक यांना येत राहिली होती पण आता शेवटी न्यायालयधारक श्री. काकरेसाहेब यांनी संमेलन होईल व यापुढेही भरविले जाईल अशी स्पष्ट ग्वाही दिल्याने या संमेलन प्रकरणावर अखेरचा पडदा पडला आहे असे ते म्हणाले. अध्यक्ष, प्रमुख पाहुणे, न्यायालयधारक व लांबून लांबून आलेल्या सर्व लेखकांचे व येथल्या अधिकारी वर्गाचे सहकार्य दिल्याबद्दल हार्दीक आभार त्यांनी मानून त्यांना शतशः धन्यवाद दिले व सायंकाळी ७-३० नंतर श्री. सातार्डेकर व कु. पुजारी यांच्या भैरवी गायनानंतर हा सुंदर संमेलन सोहळा संपला.

☆

आभार ! आभार ! आभार !

आमचे परमपूज्य पिताजी श्री. तुकारामजी उर्फ भाऊसाहेब चेंदवणकर यांच्या दुःखद निधनाबद्दल सांत्वन करणारी अनेक संस्थांची इष्टमित्रांची, आप्त नातलगांची परिचित अपरिचितांची व असंख्य साईभक्तांची पत्रे आमचेकडे आली, अनेकांनी आम्हाला प्रत्यक्ष भेटून आम्हाला धीर दिला. त्या सर्वांचे व्यक्तिशः आभार मानणे केवळ कठीण असल्याने याच निवेदनाने त्या सर्वांचे आभार मानीत आहोत.

-- चेंदवणकर कुटुंबिय.

पंचम लेखक–कवी स्नेहसंमेलन शिरडी

डॉ. गजानन गोविंदराव दाभोळकर यांचे

अध्यक्षीय भाषण

सन्माननीय उपस्थित गुरुबंधु–भगिनीनो, ज्या श्रीसाईबाबांमुळे हा लेखक कवि संमेलनाचा उपक्रम अलीकडे त्यांच्या भक्तांनी सुरू केला, त्या गुरूमाऊलीला कृतज्ञता पूर्वक प्रथम अभिवादन करून, आपण आजच्या संमेलनास सुरवात करू या. आश्चर्य, म्हणजे माझ्या सारख्या, ज्याला काव्याचा गंधही नाही. अशा एका अनभिज्ञ माणसाला अध्यक्षपदी बसवून आजच्या ह्या संमेलनास सुरवात व्हावयाची. मी कवि म्हणजे विद्वान म्हणजे सर्वदर्शी नव्हे. किंवा काव्यरचना करणारा एक माणूसही नाही. मी एक केवळ बाबांचा अगदी कनिष्ट प्रतीचा सामान्य भक्त आहे. मात्र मी बाबांना चारदोन वेळा प्रत्यक्ष पाहिले आहे. म्हणूनच आज माझा हा सन्मान होत असावा.

माझ्या वडिलांमुळेच मला बाबांचे प्रत्यक्ष दर्शन घडले. माझे वडील कै. अण्णासाहेब दाभोलकर हे बाबांचे अगदी निकटवर्ती भक्त होते. हा मुद्दा एक योगायोगच. तत्पूर्वी ते एक सरकारी रेव्हेन्यू खात्यात अधिकारी होते. शिर्डीला ते कै. काकासाहेब दिक्षित व कै. नानासाहेब चांदोरकर या दोन व्यक्तीमुळेच प्रथम शिर्डीला गेले. गुरु व भक्ति थोडीशी वावडीच होती. शिर्डीला गेल्यावर प्रथम दिवशीच त्यांचा व इतर भक्तांचा, दैव थोर की कर्तत्व थोर या विषयावर एक खडाजंगी वादविवाद झाला. असे श्रीसाईंसच्चरितात त्यांनी नमूद केले आहे. याच वादविवादामुळे बाबांनी त्यांना हेमाडपंत ही पदवी बहाल केली. वादविवाद बाबांच्या मशीदीपासून एक फर्लांगावर झाला होता. पण सर्वदर्शी व अंतरज्ञानी बाबांना तो माहीत झाला होता. म्हणूनच बाबांनी त्यांना ही पदवी अर्पण करून डवचले. वादविवादाने परमेश्वर प्राप्ती तर नाहीच पण परमेश्वर भक्तिही मिळू शकत नाही असा बाबांचा रोख होता. माझ्या वडिलांनी मात्र ती पदवी पोटाशी बाळगून आपली कृतज्ञता व्यक्त केली. तसेच माझ्या वडिलांचा गुरूपरंपरेवरसुद्धा तसा विश्वास नव्हता. परंतु बाबांचा समागम प्राप्त झाल्यावर, त्यांच्या डोळ्यात अंजन पडून ते बाबांचे एक कट्टे भक्त बनले. ही सर्व किमया बाबांचीच. पहिल्या दिवशीच धूळ भेटीत बाबांनी त्यांना त्यांच्या भूतभविष्याचे समालोचन करून दाखविले व त्यामुळेच बाबांचे त्यांना गुरुत्वाकर्षण झाले व ते बाबांचे अंकित झाले किती अजब बाबांची सत्ता व करणी. हे सर्व अघटित झाले ते १९१० साली. त्या काळी शिर्डीचा प्रवास फार दगदगीचा होता. खटाऱ्याचा प्रवास, कोपरगावाहून शिर्डीला पोचावयास अडीच ते तीन तास लागत. तरी सुद्धा बाबांच्या दर्शनाला रीघ लागत असे.

माझ्या वडिलांना बाबांचे चरित्र लिहिण्याचा लाभ मिळून त्यांची मनलालसा भक्तिमय व काव्यमय झाली व म्हणूनच त्यांनी श्रीसाईसच्चरितासारखा एक नितांत-रसाळ व काव्यमय असा ग्रंथ निर्माण केला. हे सर्व बाबांना त्यांचे हातून करून घ्यावयाचे होते. इंग्रजीत सांगावयाचे म्हणजे "Baba moulded out of common day a great poet and biograp her" नाहीतर ते शेवटपर्यंत जमाबंदी, दुष्काळ निवारण व तत्सम कार्य करून सरकारी नोकरीतून निवृत्त झाले असते. हिशेब ठेवण्याचे कार्यही त्यांनी शिर्डीसंस्थानाकरिता बाबांच्या समाधी नंतर बरेच वर्षे केले व त्यांचा वारसा मीही ८–९ वर्षे पाळला. अशा वडिलांचा मुलगा व प्रत्यक्ष साईदर्शनाचा लाभ मिळालेला म्हणून माझी आजच्या अध्यक्षपदी नियुक्ति झाली. अन्य माझा अधिकार नाही.

लेखक काव्य संमेलनाचा हा नूतन उपक्रम साईभक्तांनी सुरु केला आहे. तो फार उपयुक्त आहे. त्यामुळे कदाचित बाबांच्या कृष्णलिला, लेखन काव्य सृष्टीत येऊ शकतील. जे सर्वसाधारण माणसास चर्मचक्षूनी अवगत होऊ शकत नाही ते काव्यहृदयाला दिसत असते. उदात्तता, निसर्गसौंदर्य, असाधारण सहृदयता व तत्सम भाव हे काव्याचे विषय असतात. काव्याला बुद्धि किंवा विद्वत्ता यांचे वावडे असते. आपणाला माहीत असेलच की बाबांच्या हयातीत ज्या अशिक्षित बाया त्यांच्या दर्शनाला येत, त्याही बाबांच्या विषयी वचने रचीत व इतर उद्योगात चूर असताना ती वचने गुणगुणत. हेमाडपंतांनी अशा कवनांचा एक स्वतंत्र अध्याय श्री साईसच्चरितात गुंफण्याचा संकल्प केला होता. पण तो तेथे आलेला नाही कदाचित विस्मृतीमुळे राहून गेला असेल.

फार प्राचीन काळी म्हणजे ऋग्वेदकाळी काव्यानेच वाङमयाला सुरुवात झाली. त्याकाळचा मानव रमणीय निसर्गाच्या सान्निध्यात वाढला. निसर्गाने त्याला आकर्षित व भयभीतही केले असावे व निसर्गाचे कौतुक म्हणूनच ऋग्वेदातील प्रार्थना व रूचा काव्यात आल्या. निसर्ग, मानवी अंतकरण व सृष्टी निर्माण करणारा परमेश्वर यांचा काव्याशी फार गाढ संबंध आहे. आपण ऋग्वेदातील पुरुषसूक्तच उदाहरणार्थ घेऊ. त्यात निसर्ग हाच सर्वव्यापी परमेश्वर याचे हृदयगंम वर्णन आले आहे. ज्याला आपण अध्यात्म म्हणतो तो काव्याशी अगदी निगडीत आहे. आपल्या भरतभूमीतच नव्हे तर सर्व पृथ्वीतलावर, हा मानवाचा अनुभव आहे. म्हणूनच रामायण, महाभारत, ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, गीत गोविंद, Light of Asia इलियड, Pilgrim's Progress, Paradise Lost, Paradise Regained गीतांजली, मेघदूत, केकावली व अलीकडे गीतरामायण व श्री चकोर आजगावकरांचे श्री साईबाबांवर रचलेले एक नितांत मनोहर गीत अशी अनेक काव्ये निर्माण झाली.

सर्वधर्माचा अंतिम उद्देश अनवद्य आनंद, प्राप्त कारणे होय. परमेश्वर सत, चित्, आनंद होय. त्या आनंदाची किंचित झुळुके मानवाला काव्यातूनच मिळते. वैषयीक सुख, क्षणिक तर सच्चिदानंद अविनाशी व अवीट, म्हणूनच काव्य व अध्यात्म हे आनंदाला पोषक आहेत. अशा आनंददायक काव्याची निर्मिती, उत्तरोत्तर बाबांच्या कविभक्तांनी करून आनंदी आनंद दरवळून सोडावा अशी मी बाबांना प्रार्थना करतो. असो.

आता मी थोडेसे बाबांविषयी बोलणार आहे. बाबा व्याख्याने किंवा प्रवचने करीत नसत. प्रत्येक भक्तांची ग्राहकशक्ती आजमावून, मोजके बोलत किंवा एखादी गोष्ट सांगत. मार्मिक विनोद करत पण त्यातून तत्व सांगत. काका चिंचणीकर व मावशी बाई कौजलगी यांचीच गोष्ट पहा. एकदा ती दोन्ही बाबांचे हातपाय दाबून सेवा करीत असताना त्यांची तोंडे एकमेकांशी अचानकपणे भिडली. त्याबरोबर मावशीबाई काकांस माझ्या तोंडाचा मुका घेतोस काय म्हणून म्हणाल्या. शीघ्रकोपी काकांचा ज्वालामुखी उसळून ते मावशीबाईस लाथाताथाने बोलून त्यांनी मावशीबाईसच दोष दिला त्यांचा तंटा निवारण्यासाठी हजरजबाबी बाबा चटदिशी उद्गारले की मुलाने आईचा मुका घेतल्यास त्यात अनुचित असे काय आहे. असो, हसत विनोद करून बाबांनी तत्व निश्चित केले. दुसरी गोष्ट माझ्या बडिलांची, एका रविवारी तो बाजारचा दिवस होता माझे वडील मशिदीत बाबांचे पादसंवाहन करीत असता त्यांच्या खाली कोटाच्या अस्तन्यावरून बरेच फुटाणे खाली गडबडून पडलेले सर्वांना दिसले. लगेच माधवराव देशपांड्यानी हे फुटाणे कोठून आले असे त्यांना स्पष्ट विचारले. वडील बुचकळ्यात पडले. बाबांनी मात्र त्याला एकेकटे खाण्याची वाईट सवय आहे असा तारोरा पोहला. शाले बडिलांनी प्रामाणिकपणे सांगितले की त्यांना तशी सवय मुळीच नाही. वर बाबा बोलले की त्यांना तरी कोणतीही वस्तु खाण्यापूर्वी आठवतो का ? तत्व फार मोठे होते ते म्हणजे कोणतीही वस्तु खाण्यापूर्वी परमेश्वराचे किंव गुरूचे स्मरण करूनच नंतर ती वस्तु खावी. त्यात किती नीति साठविली होती ? बाबांचे सर्व बोल नीतिगर्भ असत.

बाबांनी भक्तिमार्गच सांगितला हे खरे कारण तो सर्वांना शक्य असतो. ज्ञानमार्ग, ध्यान, समाधी, बहुजना समाजाला अशक्य कोटीतील असतात व म्हणून शक्य नाहीत. बाबांचे सर्व भक्त गृहस्थाश्रमी होते. म्हणूनच त्यांना संन्यास प्रवृत्त केले नाही. मात्र एका गृहस्थाश्रम्याला त्याची निवृत्ती व परिपक्वता बघून संन्यासाकडे वळविले ते गृहस्थ म्हणजे उमरानीबाबा. बाकीच्या सर्व भक्तांना संसारात राहून प्रवाहपतित सुखदुःखाना तोंड द्या. शक्यतो परोपकार करा, दुष्टवृत्तीना फाटा द्या, वैयक्तिक वादविवाद, टाळा, परमेश्वराचे नामस्मरण करा, कर्जबाजारी होऊ नका,

निष्ठा व सबूरी राखा, ऐहिक जीवन क्षणभंगूर म्हणून समजा असाच त्यांचा सर्वांचा वचनी पडेल असा उद्देश होता.

बाबा जरी साधेसुधे होते, रांगडी भाषा बोलत असत, गोष्टी सांगत, नाच मुरळ्यांचे कार्यक्रम करून घेत, भक्तिमार्गाचा अप्रत्यक्ष प्रचार करीत तरी ते एक शुद्ध अद्वैतवादी होते. त्यांचा कै. नानासाहेबांबरोबर गीतेच्या चौथ्या अध्यायावर संवाद झाला त्यावरून ते किती ज्ञानी होते हे सिद्ध होते. ज्ञान उपदेशाने मिळत नसते, अज्ञान गेल्यावर ज्ञान आपोआप प्राप्त होते कारण ते स्वयंसिद्ध आहे. खरे म्हणजे ज्ञानातीत होऊन नंतरच परमेश्वराचा साक्षात्कार होतो. सृष्टीचा प्रारंभ ज्या परमेश्वरामुळे झाला तो परमेश्वर या सृष्टीत समाविष्ट झाला आहे. त्या सृष्टीची उत्पत्ती परमेश्वरामुळेच झाली व ती सृष्टी शेवटी परमेश्वरातच विलीन व्हायची आहे. परमेश्वराला मात्र आदिअंत नाही. तो त्रिकालबाधीत आहे. तो परमेश्वर प्रत्येक मनुष्याच्या हृदयात आहे. त्यालाच शरण जाऊन प्रत्येकाने आपली सोडवणूक करून घ्यावी. सत्पुरुषांचे आपण अवतार म्हणून मिरविणारे बद्रिकेदारला शिष्यगणांबरोबर जाऊन तेथील देवस्थानचे सामर्थ्य गेल्यामुळे आपण ते re-charge करून पूर्ववत करतो असे हातचलाखीचे प्रयोग करणारे, अशा गुरूंचा अलीकडे फारच सुळसुळाट झाला आहे. अशा गुरुपासून परमेश्वर प्राप्ती तर दूरच पण असे गुरुत्व परमेश्वरापासून दूरच असणार.

स्वतः संन्याशी राहून बाबानी गृहस्थाश्रमीप्रमाणे जीवन कंठले An ounce of practice is more than a tone of preaching हे तत्व बाबांनी सक्रीय स्वरूपात, भक्तांच्या मनात प्रतिबिंबित करण्याचा प्रयत्न केला, किती थोर पुरुष ते होते. तुम्ही त्यांना अवतारी माना की प्रत्यक्ष देव म्हणून समजा. ते एक अद्वितीय पुरुष होते हे कोणालाही मान्य होईल. आम्ही त्यांच्या भक्तानी त्यांचे अंशतः जरी अनुकरण केले तरीही या आयुष्यात आपण सुखी होऊ. आपण ज्याला धर्म म्हणतो तो तत्वांचा वाचाळपणा नसून तो त्या तत्वांचा आचार होय आणि तोच तर पाळला जात नाही. म्हणूनच आपली निकृष्टावस्था.

बरे आपला बराच वेळ मी घेतला व म्हणून माझे हे तुणतुणे आता थांबवतो. परंतु तुणतुण्याशिवाय गाण्याला अथवा काव्याला साथ नसते. म्हणूनच हा एवढा प्रस्ताव मी केला. त्यात थोडाबहुत मी मर्यादेचा अतिक्रमही केला असावा. आपण सर्वांनी माझ्या पांढऱ्या केसाकडे पाहून त्याबद्दल मला क्षमा करावी.

आता आपण आजच्या संमेलनाच्या कार्याकडे वळूया. तत्पर्वी पुन्हा एकदा आजच्या कार्यवाहकांचे व आपणा बंधु-भगिनींचे मनःपूर्वक आभार मानून कार्यक्रमाला सुरूवात करू या.

★

शिरडी–वृत्त माहे जानेवारी सन १९७९

या महिन्यात श्रींच्या दर्शनासाठी साईभक्तांची गर्दी बरीच होती. गुरुवार, शुक्रवार प्रजासत्ताकदिन, शनिवार, रविवार सुट्टी त्यामुळे शेवटच्या आठवड्यात बरीच गर्दी होती. शिवाय दि. २८–१–७९ व दि. २९–१–७९ दोन दिवस श्रीसाईलीला लेखक–कवींचे पंचम स्नेह संमेलन शिरडी येथे झाले, त्यामुळे यात्रेचे स्वरूप आले होते. काही कलाकारानी श्रींच्या पुढे हजेरी दिली ती खालील प्रमाणे—

कीर्तन :— १) संस्थान गवई श्री. ग. वि. जोशीशास्त्री यांची कीर्तने नेहमी-प्रमाणे झाली. २) सौ. वत्सला श. अस्टेकर, कोल्हापूर ३) सौ. कलावती न. चव्हाण, मुंबई कांचे कीर्तन झाले.

प्रवचन :— १) ह. भ. प. सुभाष बाबा, आश्रम, अकोला.

गायन, वादन, भजन वगैरे :— १) श्री. भोलानाथ रा. समेळ, मुंबई. २) श्री. नंदकुमार स. सारंगधर, मुंबई. ३) श्री. अशोककुमार शर्मा व पार्टी, रामलीला मंडळ अयोध्या. ४) श्री. पल्लीवाल जोशी, मथुरा. ५) श्री. ठाकूर शिवचरणसिंग. ६) श्री. मोहनदास. ७) श्री. संतराम. ८) श्री. किसन भगत. ९) श्री. मनपुरण झा. १०) श्री. कमलकुमार. ११) श्री. रमेश शर्मा. १२) श्री. ॐप्रकाश शर्मा. १३) श्री. नरोत्तम जोशी, रामलीला मंडळ. १४) श्रीमती रेणु कौशीक, सिमला. १५) सौ. सीना गरसोळे, पुणे. १६) श्री. प्रा. सुरेश गरसोळे, पुणे. १७) श्री. दिगंबर दामले, पुणे. १८) श्री. मनोहर केतकर, पुणे १९) श्री. विकास पेठकर, पुणे. २०) श्री. दत्ता केळकर, पुणे. २१) श्री. मामा साळोखे, पुणे. २२) श्री. मनोहर मो. भगत, मुंबई. २३) सौ. शोभाबाई, मद्रासी भजन मंडळ, हैद्राबाद. २४) श्री गुरुदेव भजन मंडळ, भुसावळ. २५) श्री. सदाशिव-राव बी. जाधव, पुणे. २६) कु. वास्वती डे, पुणे. २७) श्री रांजनदेवी प्रासादिक वनिता महिला भजनी मंडळ, ठाणे. २८) विजयराव मांजरेकर, मुंबई. २९) श्री. सत्यवान का. कदम, मुंबई. ३०) श्री. अर्जुन रा. माने, अ. नगर. ३१) श्री. बाबूराव ना. सूर्यवंशी, उस्मानाबाद. ३२) सौ. नेत्रवाला व्ही. भाटे, मुंबई. ३३) डॉ. कमल मुछुमदार, जमशेदपूर. ३४) श्री. एस. के. वर्मा, जबलपूर. ३५) सौ. रीता वर्मा, जबलपूर. ३६) श्री. रामचंद्र इ. कवाडी, धारवाड ३७) श्रीराम वि. सातर्डेकर, मुंबई ३८) श्री. बाबूराव वि. सांदिवडेकर, मुंबई. ३९) सौ. ललितप्रभा कुलकर्णी, मुंबई. ४०) श्री. कमलाकर सु. चाफेकर, मुंबई. ४१) श्री. साईनाथ भजन मंडळ, मुंबई. ४२) श्री. बाळ चावरे, मुंबई. ४३) श्रीधर रा. केंकरे, मुंबई. ४४) श्री. विजय ग. सुर्वे, मुंबई.

साईलीला, कवी-लेखक स्नेहसंमेलन, शिरडी १९७९

कलाकारांची नावे :—

१) ह. भ. प. श्रीराम दि. परचुरे, मुंबई. २) श्रीराम बा. आठवले, पुणे. ३) कु. जयश्री र. पुजारी, पुणे. ४) श्री. बिपीन चव्हाण, नवापूर. ५) श्री. रमेश चव्हाण, नवापूर. ६) सौ. लीलाताई डी. मराठे, धुळे. ७) श्री. आप्पा सामंत, मुंबई. ८) श्री. नागेश मोगलाईकर, धुळे. ९) श्री. जगत पुरिया शिरुर. १०) श्री. मधुकरराव मंडलीक, नवापूर. ११) सौ. सुमती खानविलकर, लोनावळा. १२) श्री. जगदीश देवपुरकर, धुळे. १३) श्री. मनोज चौहाण, नवापूर. १४) श्री. जगन्नाथ ना. कुलकर्णी, पुणे. १५) श्री. हसमुख ओकार पाटील, नवापूर. १६) श्री. रघुनाथराव सांडभोर, पुणे. १७) श्री. प्रकाश करपे, इंदोर. १८) श्री. दत्तात्रय मोरे, नागपूर. १९) श्री. गुंडेराव पटवारी, बीदर. २०) श्री. विजयकुमार हजारे, मुंबई. २१) श्री. नागेश दिवाकर, मुंबई. २२) श्री. डी. बी. पोतनीस, पिंपरी. २३) सौ. कलावती चव्हाण, मुंबई. २४) श्री. राजाभाऊ पटवर्धन, मुंबई. २५) श्री. गणेश ज. चितांबर अ. नगर. २६) श्री. आप्पासाहेब लोंबर, पुणे.

प्रजासत्ताक दिन : — दि. २६ जानेवारी १९७९ रोजी सकाळी ७-३० वा. मंदिराचे गच्चीवर कोर्ट रिसीव्हर श्री. क. ही. काकरे यांचे शुभहस्ते ध्वज वंदन झाले. कार्यक्रमास संस्थान कर्मचारी, सेवेकरी, गावातील प्रतिष्ठीत नागरिक, बाहेर-गावाहून आलेले साईभक्त, साईनाथ माध्यमिक विद्यालयातील शिक्षकवर्ग, विद्यार्थी, विद्यार्थिनी, बॅण्डपथक, प्रायमरी स्कूलमधील विद्यार्थी, होमगार्ड उपस्थीत होते. कार्यक्रम उत्साहाने साजरा झाला. प्राथमिक व माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना संस्थानतर्फे खाऊ वाटण्यात आला.

माननीयांच्या भेटी :—

१) मा. श्री. के. बी. जितकर IAS, जिल्हाधिकारी, अहमदनगर.

२) मा. श्री. के. सी. श्रीवास्तव IAS, जिल्हाधिकारी, ठाणे.

३) मा. नामदार श्री. शंकररावजी चव्हाण, अर्थ, ऊर्जा आणि नियोजन मंत्री महाराष्ट्र, मुंबई.

४) मा. डॉ. के. रंगाप्पा IAS, डे. कमिशनर, विजापूर.

५) मा. श्री. शांतानु IAS, बिजापूर.

६) मा. जस्टीस श्री. डी. एन्. मेहता, जज्ज हायकोर्ट, मुंबई.

७) मा. श्री. ॐप्रकाश गणहोत्रा IAS, चिफ एक्झिक्युटीव्ह ऑफिसर जि. परिषद, अ. नगर.

८) मा. श्री. पटवर्धन, इनकम टॅक्स कमिशनर, महाराष्ट्र.

९) मा. श्री. कावळे, चिफ इंजिनिअर इलेक्ट्रीसीटी बोर्ड, महाराष्ट्र.

१०) मा. श्री. के. सुब्रम्हण्यम्, मेंबर ऑफ बॅकवर्ड क्लास, हैद्राबाद.

११) श्रीसाईं पादानंद राधाकृष्ण स्वामीजी, अध्यक्ष अखिल भारतीय साईसमाज, मैलापूर, मद्रास.

१२) डॉ. गजाननराव गोविंदराव दाभोळकर, मुंबई.

हवापाणी :— शिरडी येथील हवापाणी उत्तम आहे. पहाटे गारवा असतो.

श्री साईबाबा संस्थान, शिर्डी तर्फे शिष्यवृत्त्यांचे वाटप

• • दरसाल श्री साईबाबा संस्थान शिर्डी तर्फे देशातील होतकरू व लायक विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार शिष्यवृत्त्या देण्यात येतात. १९७८ साली अहमदनगर जिल्ह्यातील विविध महाविद्यालये व माध्यमिक शाळा व मुंबई, पुणे, बेळगाव, मिरज, नासिक, सांगली, सातारा, सोलापूर वगैरे जिल्ह्यातील कला, वाणिज्य, सायन्स, शेतकी, अभियांत्रिकी, तंत्रनिकेतन, पशुवैद्यक, वैद्यकीय विधी महाविद्यालये यातील १७० विद्यार्थ्यांना एकूण रु. ३०,०००— चे शिष्यवृत्ती वाटप करणेत आले आहे. या शिवाय खुद्द शिर्डी येथील प्राथमिक व माध्यमिक विद्यालयालाही दरसाल विविध बाबींकरता अनुदान दिले जाते.

तसेच शिर्डी येथील प्राथमिक शाळेस शैक्षणिक साहित्य घेणेसाठी रू. १९००— साईनाथ माध्यमिक विद्यालयास पुस्तक पेढीसाठी रु. ४००— व कोपरगाव येथील के. जे. सोमैया कॉलेजच्या पुस्तक पेढीसाठी रु. ३०००- तीन हजार व सावळी विहीर बु. येथील माध्यमिक शाळेच्या इमारतीसाठी दहा हजार रूपये व कोऱ्हाळे येथील माध्यमिक शाळेच्या इमारतीसाठी पाच हजार रुपये अनुदान दिले आहे. असे शिर्डी संस्थानचे कोर्ट रिसीव्हर श्री. क. हि. काकरे यांनी सांगितले.

श्री दासनवमी निमित्य

श्री रामदास भजन

आलो भजनाला हो, आलो भजनाला
राम नामाच्या माळी जपण्याला ॥ ध्रु० ॥
सज्जन गडावरी हो समर्थांची स्वारी । पाहुनी–
आलो दत्त मंदीरी । करु स्वागताला
हो देऊ आसनाला, राम नामाच्या माळी–
जपण्याला ॥ १ ॥

गंध पुष्प वाहूनी । घालू तुळसी माळा ।
राम नामाच्या माळी–
जपण्याला ॥ २ ॥

संतांच्या लीला आनंदाने गाऊ ।
रामदासांच्या भाळी बुक्का लावू ।
समर्थांनी दिला हो । ज्ञान मंत्र अमृत ।
रामनामाच्या समंनीं हातात ।
जय जय रघुवीर गुरुमंत्र हा दिला ।
रामनामाच्या माळी जपण्याला ॥ ३ ॥

— लिलावती कांतीलाल गुजराथी
मु. पो. शिर्डी

श्रीसाईलीला

खास रामनवमी विशेषांक

एक एप्रिल रोजी वाचकांच्या हाती पडणार

❀ साई, थोर तुझे उपकार ❀

थोर तुझे उपकार
साई थोर तुझे उपकार ॥
भक्तजनांच्या संकटसमयी
तूच एक आधार ॥
भक्ति करता मुक्ति मिळते
ऐसी ख्याती अपार ॥
श्रीसाईंच्या शिर्डीनगरी
भक्तगण येती हजार ॥
शतजन्माचा फेरा चुकवूनी
मागती तुझाच आधार ॥
स्मरण तुझ्या शिर्डीचे
मज होते अनिवार ॥
नित्य वाटते दर्शन घेण्या
यावे वारंवार ॥

—संभाजी भांगरे बी. ए.,
नवी भोई गल्ली, साळुंके तालिम समोर,
मु. पो. नंदुरबार जिल्हा-धुळे.

—शिर्डीचे साईबाबा—

शिर्डीवाले साईबाबा तू आहेस सर्वांचा देवबा
तुझ्या दरबारी आला
आणि खाली हात परत गेला
होणार नाही कधी असे
आरतीच्या वेळी गाढव येऊन बसे
शिर्डीवाले..... तू आहेस.. .....
हिन्दु मुस्लीम शिख इसाई
सर्वे तुझे गुण गायी
भक्ती तुझी सर्वेच करती
अस्ती घेऊन घरी जाती
शिर्डीवाले साईबाबा तू आहेस सर्वांचा देबबा

—श्री. विजयकुमार डी. चव्हाण,
नवभारत सोसायटी, गव्हीजवळ, नवापूर

● श्रीबाबांचा आशिर्वाद ●

दे मज आशिर्वाद साई दे मज आशिर्वाद
तुझा ध्वनि हा मंदिरी घुमता सुख वाटे त्यात ॥
साई दे मज आशिर्वाद ॥
छत्र सिंहासनी शिरडी वैसले सांग पुजा ॥
मी कशी करू येऊनि लावूनि पंति वात ॥
साई दे मज आशिर्वाद ॥
एक साई पूर्ण कृपेने ।
भक्त गर्जती अती प्रेमाने ।
ठेव तूं मस्तकी हात ॥
साई दे मज आशिर्वाद ॥
तुझ्या आशिर्वादाचे भुकेले भक्त ही आहे ।
आज साई दे मज आशिर्वाद ॥

—पद्मावती दिघे,
साऊथ तुको गंज, ९।१ नाथमंदिर जवळ,
मु. इंदूर (म. प्र.)

★ दर्शनाची घाई ★

भक्तिची पद्धत । मला नसे ज्ञात
तेलाविना वात । जळतसे
पुजेसाठी जसा । जाळीती कापूर
तसा मी आतूर । तुझ्यासाठी
धुपदीप जळे । सदैव मंदिरी
अंतरीचे वैरी । भस्म व्हावे
फोडीती श्रीफळ । फुलांचे ते हार
नको हा प्रकार । भक्तिसाठी
सुवासिक तेले । घालिती अंघुळ
मला पायधूळ । श्रेष्ठ तुझी
तुझ्या सम मानु । सर्व जाती एक
मनामध्ये नेक । श्रद्धा ठेवू !
तुझ्या विना साई । मला नको काही
दर्शनाची घाई । लागलीरे

श्रीसाईलीलेचे पंचम संमेलन

श्रीसाईकृपेने 'श्रीसाईलीलेचे पंचम संमेलन
घडले जाइले। भावभक्तीने फुलले नंदनवन ॥ धृ० ॥

दिशा दिशातील लेखक–कवींचा भरला मेळावा
साईभक्तीचा शिर्डीक्षेत्री, रम्य रंगला सोहळा
शब्दसुगंधे पुलकीत माती; लाजलाजले चंदन ॥ १ ॥

साईसेवक राधाकृष्ण आले दक्षिणेतूनी
'साईसुधे'ने धन्य सकला, केले आशिश देवूनी
तृप्तच झाले आयू वाटले करता स्वामींशी वंदन ॥ २ ॥

हेमाडपंतसूत करी विभुषित पद अध्यक्षांचे
साईस्पर्शें पावन झाले, गजानन 'बापू' बाबांचे
शब्दागणिक तयांच्या ऐकले साईहृदींचे स्पंदन ॥ ३ ॥

गणेश आले चितांबरांचे मार्गदर्शनासाठी
वडीलबंधूसह उभाच वाटे लक्ष्मण रामापाठी
खेळखेळले साईअंकी त्यांचे कृतार्थ ते जीवन ॥ ४ ॥

वरदहस्त आईचा ज्यावर ते काकरे थोर
न्यायाधीश कनवाळू। शिर्डीसंस्थान रिसिव्हर
'साईलीले' द्वारा अखंड करीती; बोधामृतमंथन ॥ ५ ॥

निशीदिनी मिटविती तिमिरा नभी शशीभास्कर
श्रीसाईलीलेचे तैसेचि, परचुरे-चंदवणकर
पूज्य सकला हास्यमुर्ति, तयासी नम्र अभिवादन ॥ ६ ॥

'बाबां'नी घडविले म्हणूनी, पार यशस्वी पडले
'विघ्नसंतोषी'चे उखळ, पुरे पांढरे झाले
कधीच संपले, कुणा न कळले हे पंचम संमेलन ॥ ७ ॥

—विजय द. हजारे एम. ए.
सी/६, गुंफादर्शन फर्स्टकार्टर रोड,
बोरीवली पूर्व.

घोषणा

श्रीसाईलीला मासिकाच्या मालकीबद्दल व अन्य तपशीला बद्दल दरवर्षी फेब्रुवारी नंतरच्या पहिल्या अंकात प्रसिद्ध करावयाची घोषणा :—

१) प्रकाशनाचे स्थळ	...	"साईनिकेतन," ८०४ बी. डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई—४०० ०१४.
२) प्रकाशनाचा कालावधी	...	मासिक
३) मुद्रकाचे नाव	...	श्री. पांडुरंग दाजिबा मोरे,
राष्ट्रीयत्व	...	भारतीय
पत्ता	...	बॉम्बे नॅशनल प्रिंटर्स, वडाळा, मुंबई-४०० ०३१.
४) प्रकाशकाचे नाव	...	श्री. कन्हय्यालाल हिरालाल काकरे
राष्ट्रीयत्व	...	भारतीय
पत्ता	...	'साई निकेतन', ८०४ बी डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई—४०० ०१४.
५) संपादकाचे नाव	...	श्री. कन्हय्यालाल हिरालाल काकरे
राष्ट्रीयत्व	...	भारतीय
पत्ता	...	साईनिकेतन, ८०४ बी. डॉ. आंबेडकर मार्ग दादर मुंबई ४०००१४
६) हे पत्र ज्यांच्या मालकीचे आहे त्यांचे व १ टक्याहून अधिक भांडवल धारण करणारे भागधारक यांची नावे व पत्ते		श्रीसाईबाबा संस्थान शिरडी (धार्मिक व चॅरिटेबल संस्था)

मी, श्री. कन्हय्यालाल हिरालाल काकरे यानुसार असे घोषित करीतो की, वरील तपशिल माझ्या माहिती प्रमाणे व समजुती प्रमाणे सत्य आहे.

क. ही. काकरे
(प्रकाशकाची सही)
कोर्ट रिसिव्हर
श्रीसाईबाबा संस्थान, शिरडी

मार्च १९७९

श्रीसाईबाबा संस्थान शिरडीची प्रकाशने

श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी यांच्या प्रकाशनांच्या किंमती

	रु. पै.
(१) श्रीसाई सच्चरित्र, (मराठी)	१६–००
(२) श्रीसाई सच्चरित्र, (इंग्रजी)	६–२५
(३) श्रीसाई सच्चरित्र, (गुजराती)	६–५०
(४) श्रीसाई सच्चरित्र, (हिन्दी)	७–५०
(५) श्रीसाई सच्चरित्र, (कानडी)	८–००
(६) श्रीसाई सच्चरित्र, (सिंधी)	१०–००
(७) गुजराती पोथी (शरणानंद)	५–५०
(८) श्रीसाईनाथ स्तवनमंजिरी व सुमनांजलि, (मराठी)	०–३०
(९) श्रीसाईनाथ स्तवनमंजिरी व सुमनांजलि, (गुजराती)	०–३०
(१०) दासगणूकृत ४ अध्याय, (मराठी)	०–८०
(११) सगुणोपासना, (मराठी)	०–३०
(१२) सगुणोपासना, (गुजराती)	०–२५
(१३) श्रीप्रधानकृत चरित्र, (इंग्रजी)	२–००
(१४) साईलीलामृत, (मराठी)	५–००
(१५) सचित्र साईबाबा, (चित्रमय संग्रह)	२–००
(१६) साईबाबा अवतारकार्य, (अ. य. थोंड)	३–००
(१७) शिर्डीचे श्रीसाईबाबा, (के. भ. गव्हाणकर)	५–००
(१८) शिर्डी दर्शन (६६ चित्रांचा संग्रह)	४–५०
(१९) मुलांचे साईबाबा, (मराठी)	१–२५
(२०) मुलांचे साईबाबा, (गुजराथी)	१–००
(२१) चिल्ड्रेन्स साईबाबा, (इंग्रजी)	१–५०
(२२) मुलांचे साईबाबा (तेलगु)	१–५०
(२३) बच्चोंके साईबाबा (हिंदी) सदानंद चंदवणकर	१–००
(२४) साई किर्तनमाला, (मराठी)	१–२५
(२५) साई दी सुपरमन, ले. स्वामी साई शरणानंद, (इंग्रजी)	३–२५
(२६) श्रीसाई रूद्राध्याय, (मराठी)	०–०५
(२७) श्रीसाई गीतांजली, (मराठी)	०–०५
(२८) गाईड टु शिर्डी, (इंग्रजी)	०–१०
(२९) श्रीसाईलीला, अधिकृत मासिक मुखपत्र, (मराठी व इंग्रजी) वार्षिक वर्गणी, प्रत्येक प्रत	